CMYK

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. १७ मे २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ३३ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## सोन्या चांदीच्या दरात घसरण

मुंबई : एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी (छीशपवीर चेवळ) यांनी देशवासियांना वर्षभर सोनं खरेदी न करण्याचं आवाहन केलं असलं तरी लग्नसराईच्या मोसमात सोन्या-चांदीच्या दागिन्यांच्या खरेदीचा कल वाढत असल्याचं दिसून येत आहे. दरम्यान, मौल्यवान धातूंच्या किमतीत सातत्याने चढ-उतार सुरू असून शनिवार, १६ मे रोजी सोन्या-चांदीच्या दरात मोठी घसरण पाहायला मिळाली. काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना एक वर्ष सोनं खरेदी टाळण्याचं आवाहन केलं होतं. मात्र सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने बाजारात सोनं आणि चांदीच्या दागिन्यांना मोठी मागणी आहे. त्यामुळे खरेदी वाढली असली तरी दुसरीकडे जागतिक बाजारातील घडामोडींमुळे दरांमध्ये मोठे बदल होताना दिसत आहेत.

## कॅब सेवा चालू राहणार

मुंबई : सध्या सोशल मीडियावर ओला , उबर आणि रॅपिडो यांसारख्या लोकप्रिय कॅब सेवा महाराष्ट्रात कायमच्या बंद झाल्या असल्याच्या चर्चांना मोठे उधाण आले आहे. यामुळे प्रवाशांमध्येही गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने या सर्व अफवा फेटाळून लावल्या आहेत. राज्य सरकारने स्पष्ट केले आहे की, या प्सवर किंवा त्यांच्या कार सेवांवर कोणतीही सरसकट बंदी घालण्यात आलेली नाही. कारवाईचा बडगा केवळ या प्सच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या 'अनधिकृत बाईक टॅक्सी' सेवांवर उगारण्यात आला आहे.

## महिला सुरक्षेसाठी तपासणी

मुंबई : राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खासगी आस्थापनांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३' अर्थात झजङक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश महिला व बाल विकास विभागाने दिले आहेत. यासंदर्भात महिला व बाल विकास विभागाने महत्त्वपूर्ण शासन परिपत्रक जारी केले असून, विविध आस्थापनांची तपासणी करण्यासाठी अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

## पेट्रोल पंप कर्मचाऱ्यावर हल्ला

नागपूर : नागपूर जिल्ह्यातील केळवद परिसरात पेट्रोल पंपावर घडलेल्या एका धक्कादायक घटनेने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. किरकोळ वादातून सहा युवकांनी पेट्रोल पंप कर्मचाऱ्यावर जीवघेणा चाकू हल्ला केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र या घटनेनंतर केळवद पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे काही तासांतच सर्व आरोपी पोलिसांच्या ताब्यात आले.

## चोरट्यांनी एटीएम मशीन चोरले

सोलापूर : सोलापूर शहरातील घरकुल परिसरातील सग्गम नगर भागात असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाचे चक्क एटीएम मशीनच चोरट्यांनी पोबारा केलं आहे. आज शनिवारी पहाटेच्या सुमारास एटीएम मशीन उखडून पळवून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या धाडसी चोरीमुळे सोलापूर शहरात प्रचंड खळबळ उडाली आहे. पोलिसांचा फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला असून चोहोबाजूंनी पोलीस कसून तपास करत आहेत.

# 'द हेग'मध्ये जाणवला महाराष्ट्र, राजस्थान आणि यूपीचा उत्साह!

## मोदींकडून नेदरलँड्समधील अनिवासी भारतीयांचे विशेष कौतुक



वृत्तसंस्था

हेग : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १६ मे रोजी नेदरलँड्समधील 'द हेग' शहरात अनिवासी भारतीयांच्या एका भव्य मेळाव्याला संबोधित केले. हजारो मैलांवर परदेशात राहूनही भारतीयांनी आपली मूळ संस्कृती, परंपरा आणि मुळे किती घट्ट जपली आहेत, हे पाहून पंतप्रधान मोदी भारावून गेले. या विशेष कार्यक्रमात उपस्थितांशी संवाद साधताना, त्यांनी भारतीय समुदायाने नेदरलँड्सच्या प्रगतीत आणि विकासामध्ये दिलेल्या अमूल्य योगदानाचे तोंडभरून कौतुक केले.

भारताच्या विकासात आणि जागतिक स्तरावर देशाची प्रतिमा उंचावण्यात अनिवासी भारतीयांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी अभिमानाने नमूद केले.कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रवेश करताना आलेल्या भारावून टाकणाऱ्या अनुभवाचे वर्णन मोदींनी आपल्या भाषणात केले. त्यांना तिथे जणू एका 'लघु भारता'चेच (MINI INDIA) दर्शन घडले. उपस्थितांमधील ऊर्जा आणि विविधतेचा उल्लेख करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, मी जेव्हा या भव्य सभागृहात प्रवेश करत होतो, तेव्हा मला इथे संपूर्ण महाराष्ट्राचा आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा तोच स्फूर्तीदायक उत्साह पाहायला मिळाला. यासोबतच माझा लाडका राजस्थान, तसेच उत्तर प्रदेश आणि आसाममधून आलेल्या माझ्या सर्व मित्र-मैत्रिणींची संस्कृती मला इथे एकाच छताखाली अनुभवता येत आहे.

विविध राज्यांच्या पारंपरिक वेशभूषेत आणि उत्साहात आलेल्या भारतीयांनी या युरोपीय भूमीवर खऱ्या अर्थाने भारताचे रंग उधळल्याची भावना पंतप्रधानांनी व्यक्त केली.

# ट्रम्प चीनमध्ये असताना अमेरिकेवर संकट; गॅस स्टेशन सिस्टिम हॅक



वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प चीनच्या दौऱ्यावर असताना सायबर हल्ल्यांमुळे अमेरिकेची चिंता वाढली आहे. इराणशी संबंधित हॅकर्सनी अनेक राज्यांमधील गॅस स्टेशन्सवर वापरल्या जाणाऱ्या ऑटोमॅटिक टँक गेज म्हणजेच एटीजी सिस्टिममध्ये शिरकाव केल्याचा संशय अमेरिकेच्या अधिकाऱ्यांना आहे. गॅस स्टेशन्सवरील इंधन टाकीत असलेल्या तेलाचं प्रमाण मॉनिटर करण्याचं काम एटीजी यंत्रणा करते.

अनेक एटीजी सिस्टिम कोणत्याही पासवर्ड सुरक्षेशिवाय इंटरनेटशी जोडल्या गेलेल्या होत्या. याचाच फायदा हॅकर्सनी घेतला आणि यंत्रणेत शिरकाव केला. सीएनएनच्या सुत्रांच्या हवाल्यानं दिलेल्या माहितीनुसार, हॅकर्सनी काही जागांवर टाक्यांच्या स्क्रिनवर दाखवल्या जाणाऱ्या रीडिंग डेटासोबत छेडछाड केली. पण खऱ्या इंधन पातळीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. सध्याच्या घडीला तरी कोणत्याही प्रकारच्या नुकसानाची किंवा गॅस गळतीची समस्या समोर आलेली नाही.

एखाद्या हॅकरनं एटीजी सिस्टिमवर पूर्ण ताबा मिळवल्यास, तो गॅस गळतीसारखी धोकादायक परिस्थिती लपवू शकतो, असा धोका अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी आणि सायबर तज्ज्ञांनी बोलून दाखवला. इराणी सायबर गटांनी याआधीही अमेरिकेतली तेल, वायू आणि पाणी यांच्याशी संबंधित यंत्रणेला लक्ष्य केलं. त्यामुळे यावेळीही अमेरिकेच्या यंत्रणांना इराणवरच संशय आहे.

फेब्रुवारीच्या अखेरपासून अमेरिका-इराणमधील तणाव वाढला. अमेरिकेनं इस्रायलच्या साथीनं २८ फेब्रुवारीला इराणवर हवाई हल्ले चढवले. तेव्हापासून मध्य पूर्वेत तणावपूर्ण परिस्थिती आहे. तेहरानशी संबंधित हॅकर्सनी अमेरिकेच्या तेल, गॅस केंद्रांसह पाणी पुरवठा व्यवस्थांवर हल्ले केले आहेत. सोबतच वैद्यकीय कंपन्यांनादेखील लक्ष्य केलं आहे. एफबीआयचे संचालक काश पटेल यांचे जुने मेलदेखील लीक करण्यात आले आहेत.

# इंधन बचतीसाठी अमृता फडणवीस यांचा पुढाकार

## कान्स फिल्म फेस्टिव्हलचा दौरा रद्द; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी फ्रान्समधील 'कान्स फिल्म फेस्टिव्हल'चा आपला नियोजित दौरा रद्द केला आहे. रेड कार्पेटवरील फॅशन आणि संधी पुन्हा मिळू शकते, परंतु देशहित आणि पंतप्रधानांचे आवाहन सर्वोच्च आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

कान्स चित्रपट महोत्सवासारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर महाराष्ट्राची समृद्ध कला, संस्कृती आणि विशेषतः पारंपरिक हातमाग परंपरा जगासमोर मांडण्यासाठी अमृता फडणवीस यांना निमंत्रण देण्यात आले होते. यासाठी त्यांनी विशेष तयारीही केली होती. नाशिकमधील येवला येथील स्थानिक कारागिरांनी अत्यंत कौशल्याने आणि अनेक महिन्यांच्या अहोरात्र मेहनतीने त्यांच्यासाठी एक खास पारंपरिक पैठणी साडी विणली होती. महाराष्ट्राच्या या अस्मितेचे जागतिक मंचावर सादरीकरण होणार असल्याने डिझायनर्स आणि कारागिरांमध्ये मोठा उत्साह होता. मात्र, देश पातळीवरील इंधन बचतीच्या मोहिमेला बळ देण्यासाठी त्यांनी हा दौरा रद्द केला.

दौरा रद्द करण्याच्या या महत्त्वपूर्ण निर्णयाबाबत बोलताना अमृता फडणवीस म्हणाल्या, देशहिताला आणि पंतप्रधानांच्या आवाहनाला प्राधान्य देणे हीच प्रत्येक नागरिकाची खरी जबाबदारी आहे. कान्ससारख्या जागतिक मंचावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे हा नक्कीच अभिमानाचा क्षण होता. मात्र, पंतप्रधानांनी देशातील सद्यस्थिती पाहता इंधन बचत आणि अनावश्यक परदेशी दौरे टाळण्याचे जे आवाहन केले, त्याला प्रतिसाद देणे मी माझे कर्तव्य समजते. रेड कार्पेटची संधी भविष्यात पुन्हा मिळू शकते, पण देशाला प्राधान्य देणे अधिक महत्त्वाचे आहे. रेड कार्पेट थांबू शकतं, देश नाही!, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

# प्रतिनियुक्तीवरील शिक्षकांना मूळ ठिकाणी परतण्याचे आदेश



तभा वृत्तसेवा

पुणे : निवडणुकीसह विविध प्रकारच्या शासकीय कामासाठी प्रतिनियुक्ती झालेल्या शिक्षकांना आता त्यांच्या मूळ नेमणुकीच्या ठिकाणी परत जावे लागणार आहे. शिक्षक मूळ जागेवर रुजू न झाल्यास संबंधितांचे मे महिन्यापासूनचे वेतन न देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी याबाबत संयुक्त परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी शिक्षण संस्थांमधील शिक्षकांची निवडणूक आणि अन्य कामांसाठी प्रतिनियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होतो. या पार्श्र्वभूमीवर, प्रतिनियुक्तीवर असलेल्या शिक्षकांबाबत क्षेत्रीय कार्यालयांनी सादर केलेल्या माहितीचा अहवाल शासनास सादर केला आहे.

त्यानंतर ९ मे रोजी झालेल्या बैठकीत निवडणूक आणि अन्य कामावर प्रतिनियुक्त असलेल्या सर्व शिक्षकांना त्यांचे मूळ नेमणुकीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सर्व संबंधित शिक्षकांना त्यांच्या मूळ नेमणुकीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी तत्काळ कार्यमुक्त करण्याबाबत कार्यवाही करावी. सादर केलेल्या माहितीव्यतिरिक्त शिक्षकांची प्रतिनियुक्ती शासकीय कार्यालयात असल्यास त्या कार्यालयप्रमुखांशी संपर्क करून त्यांनाही कार्यमुक्त करण्याचे निर्देश द्यावेत, असे स्पष्ट केले आहे. कार्यमुक्त केल्याचे आदेशानंतरही शिक्षक त्यांच्या मूळ जागी रुजू न झाल्यास त्या शिक्षकांचे मे महिन्याचे वेतन दिले जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच त्याबाबत वेतन अधीक्षक, भविष्य निर्वाह निधी पथक यांनाही आदेश द्यावेत. त्याशिवाय निवडणूक व अन्य कामांसाठी प्रतिनियुक्तीने कार्यरत स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी शिक्षण संस्थांमधील शिक्षक, मूळ नेमणुकीच्या जागी रुजू झालेल्या शिक्षकांचा एकत्रित अहवाल ३१ मेपर्यंत सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

# स्वामी समर्थ माझ्या मनात घर करुन : मोहन जोशी

तभा वृत्तसेवा

मुंबई : स्वामी समर्थांवरील चित्रपट केल्यावर मला जाणवायला लागलं, की माझ्यात ती शक्ती आहे. मी कुणाला काही म्हटलं तर ते यशस्वी होतात, अशी माझी समजूत आहे देऊळबंद २ चित्रपटाच्या निमित्ताने दिग्गज अभिनेते मोहन जोशी यांनी बोलून दाखविले.

देऊळबंद २ सिनेमा आल्याचा प्रचंड आनंद होत आहे. देऊळबंदचा पहिला भाग १७ आठवडे हाऊसफुल चालला होता. त्यामुळे मला माझाच अभिमान वाटला, की मी अशीही भूमिका करु शकतो, असं मोहन जोशी म्हणाले. स्वामी समर्थ तुमच्या जीवनात कधी आले, असा प्रश्न विचारला असता, मोहन जोशी म्हणाले की, स्वामी समर्थ माझ्या आयुष्यात आले नाहीत.

# पुणे पोलिस दलात मोठे फेरबदल




तभा वृत्तसेवा

पुणे: महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने राज्यातील पोलिस दलात मोठे फेरबदल केले असून, पुणे शहर, पुणे ग्रामीण आणि पिंपरी-चिंचवड पोलिस दलातील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि पदोन्नत्या जाहीर केल्या आहेत. पुणे शहराच्या सह पोलिस आयुक्तपदी संजय दराडे यांची नियुक्ती केली आहे, तर तेजस्वी सातपुते यांची पुणे शहर गुन्हे शाखेच्या अपर पोलिस आयुक्तपदी वर्णी लागली आहे.

पुण्यात बदलून आलेले अधिकारी संजय दराडे (विशेष पोलिस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र येथून पुणे शहर सह पोलिस आयुक्तपदी), तेजस्वी सातपुते (समादेशक, एसआरपीएफ गट १, पुणे येथून पदोन्नतीने पुणे शहर अपर पोलिस आयुक्त, गुन्हे पदी), एस. व्ही. पाठक (अपर पोलिस आयुक्त, ठाणे येथून विशेष पोलिस महानिरीक्षक, आर्थिक गुन्हे, सीआयडी, पुणे पदी), प्रशांत अमृतकर (समादेशक, एसआरपीएफ गट १६, कोल्हापूर येथून पुणे शहर पोलिस उप आयुक्तपदी),गौहर हसन (पोलिस उप आयुक्त, सोलापूर येथून पुणे शहर पोलिस उप आयुक्तपदी), जीवन बेनवाल (सहायक पोलिस अधीक्षक, जिंतूर, परभणी येथून पुणे शहर पोलिस उप आयुक्तपदी), पी. आर. पाटील (पोलिस अधीक्षक, सीआयडी, पुणे येथून पुणे शहर पोलिस उप आयुक्तपदी), शुभम कुमार (सहायक पोलिस अधीक्षक, अचलपूर, अमरावती येथून अपर पोलिस अधीक्षक, पुणे ग्राामीण पदी), संजय पाटील (पोलिस उप आयुक्त, नवी मुंबई येथून पोलिस उप आयुक्त, पिंपरी- चिंचवड या पदी), धीरज पाटील (प्राचार्य, पोलिस प्रशिक्षण केंद्र, सांगली येथून पोलिस उप आयुक्त, पिंपरी-चिंचवड या पदी), शफकत आमना (अपर पोलिस अधीक्षक, धाराशिव येथून पोलिस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग - सीआयडी, पुणे या पदी).

# पक्षाने पंख छाटताच प्रफुल्ल पटेल शरद पवारांच्या संपर्कात?

तभा वृत्तसेवा

मुंबई : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मागील काही दिवसांपासून वादळ निर्माण झाल्याचं दिसत आहे. राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी २९ एप्रिलला केंद्रीय निवडणूक आयोगाला दिलेल्या पत्रात सुधारित पदाधिकाऱ्यांची यादी पाठवण्यात येत असल्याचं म्हणत ही यादी अंतिम असेल असंही या पत्रात नमूद करण्यात आलं. या नव्या पत्रात फक्त सुनेत्रा पवार या राष्ट्रीय अध्यक्ष, तर शिवाजीराव गर्जेंचा कोषाध्यक्ष म्हणून उल्लेख करण्यात आला. तसंच राष्ट्रीय पदाधिकारी म्हणून पार्थ पवार व जय पवारांना राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून जबाबदारी देण्यात आल्याचे स्पष्ट झाले. या यादीत प्रफुल्ल पटेल यांचा कार्यकारी अध्यक्ष म्हणून उल्लेख केला नसल्याने त्यांना पदावरून हटवल्याची चर्चा रंगत आहे. तसंच सुनील तटकरे यांनाही दूर केल्याचे बोलले जात आहे. अशातच नुकतीच तटकरे यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची सिल्व्हर ओक निवासस्थानी भेट घेतल्याचं उघड झालं. १२ मे रोजी पवार आणि तटकरे यांच्यात झालेल्या भेटीआधी प्रफुल्ल पटेल यांनी देखील सिल्व्हर ओकवर येऊन शरद पवारांची भेट घेतल्याचे वृत्त आता समोर आले आहे.

# अंदमान-निकोबारमध्ये पावसाची हजेरी



वृत्तसंस्था

नवी दिल्ली : संपूर्ण देशातील नागरिक आणि विशेषतः शेतकरी राजा ज्याची आतुरतेने वाट पाहत होता, तो मान्सून अखेर अंदमानच्या वेशीवर येऊन पोहोचला आहे. देशात सध्या उन्हाचा कडाका आणि उष्णतेच्या लाटा जाणवत असतानाच, नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी वेळेपूर्वीच अंदमान आणि निकोबार बेटांवर अधिकृतरीत्या हजेरी लावली आहे. दरवर्षीपेक्षा यंदा मान्सूनची वाटचाल अतिशय वेगाने सुरू असून, त्याचे हे वेळेआधीच झालेले आगमन बळीराजासह उकाड्याने हैराण झालेल्या सर्वांसाठीच एक मोठा दिलासा देणारे ठरले आहे.भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी अत्यंत अनुकूल वातावरणाचा फायदा घेत आपला पुढचा प्रवास वेगवान केला आहे. सर्वसाधारणपणे मान्सून १ जून रोजी केरळमध्ये धडकतो. मात्र, यंदा या वाऱ्यांचा वेग पाहता, तब्बल पाच ते सहा दिवस आधीच म्हणजेच २६ मे च्या आसपास मान्सून केरळच्या किनारपट्टीवर धडकण्याची दाट शक्यता आहे. केरळमध्ये दाखल झाल्यानंतर पुढील प्रवासासाठी पोषक वातावरण राहिल्यास, साधारणतः ६ जूनपर्यंत मोसमी पाऊस महाराष्ट्रात प्रवेश करेल आणि कोकण किनारपट्टीवर यंदा वेळेआधीच पावसाच्या दमदार सरी कोसळतील असा हवामान खात्याचा अंदाज आहे.भारतीय हवामान विभागाच्या पुणे केंद्राने मान्सूनच्या या वेगवान वाटचालीला अधिकृत दुजोरा दिला आहे. पुणे हवामान विभागाचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी दिलेल्या सविस्तर माहितीनुसार, मान्सूनने आपल्या निर्धारित सरासरी तारखेच्या तब्बल ६ दिवस आधीच अंदमानमध्ये प्रवेश केला आहे. ही देशाच्या कृषी क्षेत्रासाठी अत्यंत सकारात्मक आणि आनंदाची बातमी मानली जात आहे. तसेच, केरळमध्येही तो सरासरीच्या ४ ते ५ दिवस आधी (२६ मे रोजी) दाखल होईल. मान्सूनच्या या वेळेपूर्वीच्या आगमनामुळे देशभरात यंदा खरीपाच्या पेरण्या वेळेवर आणि योग्य प्रकारे होण्यास मोठी मदत होईल, अशी आशा कृषी तज्ज्ञ आणि हवामान विभागाकडून व्यक्त केली जात आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मराठा आंदोलक मनोज जरांगे पुन्हा एकदा मराठा आरक्षासाठी आंतरवाली सराटीत आमरण उपोषणाला बसणार!

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा रणशिंग फुंकले आहे. ३० मे पासून मनोज जरांगे पाटील हे आंतरवाली सराटीत पुन्हा आमरण उपोषणाला बसणार आहेत. मराठा आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे बैठक बोलावली होते. यावेळी समर्थकांना संबोधित करताना त्यांनी ही घोषणा केली आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आपण अडीच-तीन वर्षापासून लढत आहोत. समाजाच्या पदरात काय पडले? जून महिन्यात ॲडमिशन आहेत. ५८ लाख नोंदी निघाल्या आहेत. सरकार जळतंय, मराठा समाजाला मोठं होऊ द्यायचं नाही ही सरकारची भूमिका आहे. सत्तेशिवाय नाही तर मराठ्यांशिवाय शहाणपण चालत नाही. आपल्या समाजाचा एवढा द्वेष का? भाजपमधल्या मराठ्यांच्या लेकीबाळीला आरक्षण लागणार नाही का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

फडणवीस, तुम्हाला मंत्री मराठ्यांनीच केलंय आपल्याकडे रुपया नाही, पैशावाले आपल्यात येत नाहीत. मी प्रामाणिक आहे. आपल्याला वारंवार लढावं लागणार आहे. मुंबई तुम्ही विचाराने जिवंत केली. मुंबईतील लोक आम्हाला पुन्हा येणार का? म्हणून विचारतात. आता आंदोलन असं करायचं की पुन्हा फडणवीसांना चारी दिशेला काही दिसले नाही पाहिजे. नुसते मराठेच दिसले पाहिजे. मी फडणवीसांना दोष देत नाही. तुम्ही हैदराबादचा ऋठ काढला पण तुम्ही का रोखले? फडणवीस तुम्हाला मंत्री



मराठ्यांनीच केलंय. अधिकारी प्रमाणपत्र देत नाहीत, त्याला फडणवीस साहेबच जबाबदार आहेत. फडणवीस साहेबांनी विधानसभेत एक भाषण केलं होतं. मंत्र्यांना किंमत नाही, मुख्यमंत्रीच सर्वेसर्वा आहेत. याचा अर्थ तुम्हीच प्रमाणपत्र रोखले आहे, असा आरोप देखील मनोज जरांगे पाटील यांनी केला. मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, फडणवीस साहेब, या गोरगरिबांची मने जिंका. तुमच्या ५० पिढ्या आल्या तरी मी मराठ्यांना धक्का लावू देणार नाही. फडणवीसांनी मराठवाड्यातील मराठ्यांना प्रमाणपत्रासाठी रोखू नये. आंदोलनाच्या तारखेच्या आता प्रमाणपत्र द्या. ५८ लाख नोंदी सापडल्या त्याचे सर्व प्रमाणपत्र द्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यावेळी अभियान घेऊन प्रमाणपत्र वाटले. तसेच फडणवीसांनी करावे. शिंदे साहेबांनी जसे अभियान घेतले तसे तुम्हीही घ्या, असे आवाहन देखील त्यांनी केले. सातारा संस्थानचा ऋठ तुम्ही का काढला नाही. अखंड महाराष्ट्र आमचा आहे. आम्ही आठ महिने दम खाल्ला. मी आता वेळ देऊ शकत नाही. सातारा, कोल्हापूर, औंध संस्थानाचा ऋठ काढून त्याची अंमलबजावणी करा. ओबीसींना कसा एका ऋठ दिवसात काढला, असे देखील त्यांनी म्हटले. एका मंत्र्याने माझ्या विरोधात बोलण्यासाठी २-२ कोटी रुपये दिले. मला माहिती कळाली. १६ संघटनांना पैसे दिले. त्यातील एक व्यक्ती इमानदार निघाला त्याने मला सांगितले. काही संघटनांची प्रेस ठरली होती. त्याचे पुढे काय झाले हे मला माहिती नाही, असा आरोप देखील मनोज जरांगे पाटील यांनी केलाय. तर समाजाने खोट्या गोष्टीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. तसेच, आंदोलनाच्या तारखेच्या आत सगळ्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या, नाहीतर भयानक आंदोलन होईल, असा इशारा देखील त्यांनी दिला.

## संक्षिप्त

### देऊळझरी येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद । प्रतिनिधी**

तालुक्यातील देऊळझरी येथे छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक परेंत मिरवणूक काढण्यात आली यावेळी तरुणाई चा ऊत्साह विषेश होता स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. यावेळी भगव्या पताका, जयघोष आणि शिवभक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे परिसर भगवेमय झाला होता. जय जिजाऊ, जय शिवराय तसेच धर्मवीर संभाजी महाराजांचा विजय असो अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित शिवप्रेमींनी महाराजांच्या अद्वितीय शौर्य, पराक्रम आणि हिंदवी स्वराज्याच्या करत कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. यावेळी शिवजंयती ऊत्सव समिती अध्यक्ष बालाजी भोपळे.उप अध्यक्ष शंकर भोपळे.सागर भोपळे पवन भोपळे. नागेश भोपळे.समाधान भोपळे प्रदीप भोपळे.सर्जेराव भोपळे.सुदाम भोपळे. आकाश भोपळे.अजित भोपळे उमेश भोपळे ओम भोपळे.पवन शेळके राम भोपळे गजानन भोपळे दत्तु भोपळे. आकाश गाडेकर रुद्र गाडेकर कैलास भोपळे शंकर भोपळे छत्रगुण भोपळे विलास भांबळे नागेश राऊत महेश भोपळे. यांच्यासह अनेक शिवप्रेमी व शंभूप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात संभाजी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला. स्वराज्याच्या रक्षणासाठी त्यांनी दिलेले योगदान, औरंगजेबाविरुद्धचा संघर्ष आणि हिंदवी स्वराज्याप्रती असलेली त्यांची निष्ठा याचे स्मरण करून उपस्थितांनी महाराजांना अभिवादन केले.



शिवसेना पक्षाचे सर्वोच्च मुख्य नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांच्याहस्ते शिवसेना पक्ष संघटनेमधे डॉ. संजय लाखे पाटील यांच्यावर सोपवलेली जबाबदारी शिवसेना पक्ष सचिव आणि सहमुख्य संपर्क प्रमुख मराठवाडा ( हिंगोली व नांदेड जिल्हा शिवसेना पक्षसंघटना) चे नियुक्तीपत्र स्विकारताना दिसत आहे. तसेच सोबत सहकारी मित्र शरद देशमुख व इतर.

### रयत नेते गजानन राजबिंडे हृदय विकाराच्या धक्क्याने निधन



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

मराठवाड्यात शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हाकेला धावून जाणारा शेतकरी नेते रयत क्रांती संघटनेचा शिलेदार हरपला शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आयुष्यभर झटणारा रयत क्रांती संघटनेचा एक लढवय्या शिलेदार शेतकरी नेते गजानन राजबिंडे यांचा हृदय विकाराच्या झटक्याने दूखत निधन झाले. रयत क्रांती संघटनेचे युवक मराठवाडा अध्यक्ष गजानन राजबिंडे (जिल्हा जालना) यांचे आज हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले. गेली ३० वर्षे शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर आक्रमकपणे लढणारा मराठवाड्यातील हा बुलंद आवाज कायमचा शांत झाला.

## भोकरदनमध्ये ४ कोटींच्या विकासकामांचे लोकार्पण उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**



नगर परिषद अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ मधून मंजूर झालेल्या एकूण रु. ४ कोटींच्या विविध विकासकामांचे लोकार्पण १५ मे २०२६ रोजी नगराध्यक्षा सौ. समरीन नाज वसीम बेग मिर्झा, उपनगराध्यक्षा सौ. सुरेखाताई बाळू अण्णा देशमुख तसेच सर्व नगरसेवक व नगरसेविका यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाले. महाराष्ट्र शासनाच्या नागरी विकास धोरणांतर्गत शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम व सुस्थितीत करण्याच्या उद्देशाने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तरीय) योजना, नागरी दलितेतर योजना तसेच नमो उद्यान अंतर्गत विविध विकासकामांना चालना देण्यात आली आहे. या योजनांअंतर्गत एकूण २६ विकासकामांना जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडून मार्च २०२६ अखेर प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली होती. नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम डिसेंबर २०२५ मध्ये यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर प्रभाग क्र. १ ते प्रभाग क्र. १० मधील सी.सी. रस्ते, भूमिगत नाली, पावसाळी पाणी निचरा व्यवस्था, शहराच्या केंद्रस्थानी नमो उद्यान तसेच इतर नागरी सुविधा विकासकामे हाती घेण्यात आली. सदर विकासकामांच्या लोकार्पणामुळे शहरातील नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा उपलब्ध होणार असून स्वच्छता, वाहतूक व्यवस्था व नागरी सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होणार आहे. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी शहर विकासासाठी शासनामार्फत उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करून नागरिकांच्या अपेक्षांनुसार विकासकामे प्राधान्याने पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाही दिली. सदर कार्यक्रमास नगरसेवक तथा गटनेता शफीक खां महेताब खां पठाण, सौ. पठाण अस्मतबेगम बशीर खां, शाह अजहर अली इनुस अली, पठाण आमेर शफीक, कदीर बापू, रणवीरसिंग देशमुख, सुमित थारेवाल, सौ. बेग कुरेशाबी शमिम, सौ. शीला भारती, राजाराम सहाने तसेच सामाजिक कार्यकर्ते जहीर कुरेशी, शमिम मिर्झा, अभिजीत भारती, किरण देशपांडे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण असून नागरिकांनी विकासकामांबद्दल समाधान व्यक्त केले. भोकरदन नगर परिषदेमार्फत भविष्यातही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

## ऑनलाईन तलवार मागवून धारदार शस्त्रे बाळगणारा युवक पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



दिनांक १५ मे २०२६ रोजी रात्री ९ वाजताचे सुमारास पोलीस ठाणे कदीम जालनाचे पथक हददीत पेट्रोलिंग करीत असतांना पथकास गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, कदीम जानला पोलीस ठाणे हददीत शिवनगर या भागात एक इसम हा त्याचे ताब्यात धारदार तलवार व खंजीर जवळ बाळगुन फिरत आहे. असे गोपनिय माहिती मिळाल्यावरुन पथकाने सदरची माहीती मा.पो. नि. शेवाळे सो. कदीम जालना यांना कळवुन त्यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली दोन पंचासंह सदर ठिकाणी सापळा लावला असतांना रात्री ९:४५ वाजता एक इसम हा संशियीत रित्या फिरत असतांना सोबतचे पंचासमक्ष मिळुन आल्याने त्यास त्याचे नाव गाव विचारले असतां त्याने त्याचे नाव यश संतोष जाधव वय १८ वर्षे ०५ महीने रा. शिवनगर जुना जालना असे असल्याचे सांगितले तेंव्हा त्यांची अंगझडती घेतली असता त्याचे शर्टाचे आत मध्ये पाठीमागील बाजुस ६ हजार ५०० रुपये किंमतीची लाल रंगाची मॅन असलेली एक धारदार पात्याची तलवार जु.वा. किं. अं. अलेली ८००/- रुपये किंमतीचा एक लाकडी मुठ असलेला धारदार पात्याचा चाकु जु.वा. किं.अ. असलेला १२,००/- रुपये किंमतीचा एक काळया रंगाचा धारदार खंजीर जु.वा. किं.अ.असलेला असा एकुण ८,५००/- रुपये किंमतीचा मुददेमालासह विना परवाना बेकायदेशिररित्या ताब्यात घेवुन फिरत असतांना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे कडे चौकशी केली असता सदरची तलवार हि त्यांने ऑनलाईन पध्दतीने मागविल्याची निष्पन्न झाले आहे. म्हणुन त्याचे विरुध्द पोलीस ठाणे कदीम जालना येथे गु.र.न. २४१/२०२६ कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा १९५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षकतेघबीर सिंह संधू, उपविभागिय पोलीस अधीकारी कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांचे नेतृत्वाखाली पोहेकॉ / सदा राठोड, पोहकों/सचिन चौधरी पोना/बाबा गायकवाड, पोकॉ/ मतीन शेख, पोकॉ इम्रान खान, यांनी केली असुन सदर प्रकरणाचा पुढील तपास हा पोहेकॉ/सदा राठोड हे करीत आहेत.

## परतूर शहरात २४ तास अत्यावश्यक वैद्यकीय सेवा सुरू करण्याचा आयएमएचा निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

### रुग्णांनी तज्ज्ञ डॉक्टरांकडूनच उपचार घ्यावेत - डॉ.स्वप्नील मंत्री

इंडियन मेडिकल असोसिएशन (खच-) परतूर शाखेच्या वतीने रविवार दि. ११ मे रोजी आकात हॉस्पिटल येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खच- परतूर शाखेचे अध्यक्ष डॉ. स्वप्नील बी. मंत्री यांनी संघटनेची भूमिका स्पष्ट करताना रुग्णांनी योग्य आणि नोंदणीकृत तज्ज्ञ डॉक्टरांकडूनच उपचार घ्यावेत, असे आवाहन केले.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, रुग्णांच्या आजारानुसार संबंधित विषयातील तज्ज्ञ डॉक्टरांकडे उपचार घेणे अत्यंत आवश्यक आहे. चुकीच्या उपचार पद्धतीमुळे रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी जागरूक राहून पात्र व नोंदणीकृत डॉक्टरांची निवड करावी. तसेच डॉक्टरांनाही त्यांनी स्पष्ट संदेश देत, प्रत्येक डॉक्टरांनी आपल्या नावासमोर स्वतःची शैक्षणिक पदवी स्पष्ट व ठळक अक्षरात नमूद करावी, जेणेकरून रुग्णांची दिशाभूल होणार नाही, असे सांगितले. पत्रकार परिषदेत खच- ही आधुनिक वैद्यकीय उपचार पद्धतीसाठी कार्य करणारी नोंदणीकृत संस्था असल्याचे नमूद करण्यात आले. डॉक्टरांच्या व्यावसायिक गुणवत्तेबरोबरच नागरिकांना दर्जेदार व सुरक्षित आरोग्य सेवा मिळावी यासाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही सांगण्यात आले. परतूर शहरातील वाढत्या वैद्यकीय गरजा लक्षात घेता, शहरात २४ तास अत्यावश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. एमबीबीएस व एमडी पदवीधारक तज्ज्ञ डॉक्टरांचा स्वतंत्र गट तयार करून आठवड्यानुसार ड्युटीचे नियोजन केले जाणार असून, संबंधित डॉक्टर अत्यावश्यक सेवेसाठी उपलब्ध राहतील. यामुळे गंभीर रुग्णांना वेळेत उपचार मिळून जीवितहानी टाळण्यास मदत होणार असल्याचे डॉ. मंत्री यांनी सांगितले. पत्रकारांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तर देताना खच- सदस्यांनी परतूर शहरात रात्रीच्या वेळेस उपचार सेवांबाबत येणाऱ्या अडचणी, रुग्णांना होणारा विलंब तसेच जालना येथे हलविताना घडणाऱ्या दुर्दैवी घटनांबाबत गंभीरपणे दखल घेतल्याचे स्पष्ट केले. भविष्यात या समस्यांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी खच- च्या आगामी उपक्रमांची माहिती देण्यात आली. त्यामध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, आरोग्य जनजागृती अभियान तसेच डॉक्टरांसाठी प्रशिक्षण व शैक्षणिक कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

खच- परतूर ही केवळ डॉक्टरांची संघटना नसून समाजाच्या आरोग्य सुरक्षेसाठी कार्य करणारी संस्था आहे. नागरिकांनी योग्य व नोंदणीकृत डॉक्टरांकडूनच उपचार घ्यावेत, असे आवाहन शेवटी करण्यात आले.

या पत्रकार परिषदेस डॉ. प्रमोद आकात, डॉ. ज्ञानेश्वर शिंदे, डॉ. शुभम तनपुरे यांच्यासह परतूर शहरातील पत्रकार व मल्टिमीडिया पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## जनगणना २०२७ अंतर्गत घरसूचीकरण व घरगणना मोहिमेची सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या निर्देशानुसार देशातील १६ वी जनगणना प्रक्रिया जानेवारी २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या कालावधीत दोन टप्प्यांत राबविण्यात येणार असून, त्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असलेल्या घरसूचीकरण आणि गृहगणना मोहिमेला जिल्ह्यात १६ मे, २०२६ म्हणजे आजपासून सुरुवात होत आहे. ही प्रक्रिया १४ जून, २०२६ पर्यंत चालणार असून, यासाठी नियुक्त करण्यात आलेले प्रगणक व पर्यवेक्षक घराघरांत जाऊन माहिती संकलन करणार आहेत.


जिल्हा प्रशासनाकडून या मोहिमेसंदर्भातील सर्व आवश्यक सूचना व माहिती प्रसिद्ध करण्यात आली असून, नागरिकांनी या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, १५ मे २०२६ रोजी सर्व प्रगणक व पर्यवेक्षकांना ट्रेनिंग ॲप काढून अधिकृत क्ळज ॲप डाउनलोड करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. १६ मे पासून प्रत्यक्ष मॅपिंगच्या कामास सुरुवात होणार असून, प्रगणक आपल्या नियुक्त क्ळइ क्षेत्राची पाहणी करून कच्चे नकाशे तयार करतील. त्यानंतर १६ ते १८ मे दरम्यान प्रगणक, पर्यवेक्षक आणि चार्ज ऑफिसर यांच्या समन्वयाने सीमांकन व इमारतींचे रेखांकन पूर्ण केले जाणार आहे. १९ ते २० मे या कालावधीत प्रत्येक घरावर 'सी.एच. नंबर' टाकण्याचे काम करण्यात येणार असून, ही प्रक्रिया उत्तर-पश्चिम दिशेकडून दक्षिण-पूर्व दिशेकडे केली जाणार आहे. यानंतर २१ मे ते ०५ जून, २०२६ या मुख्य कालावधीत प्रगणक मोबाईल ॲपच्या सहाय्याने घराघरांत जाऊन ०१ ते ३३ प्रश्नांद्वारे माहिती संकलित करणार आहेत.

## मिरची उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा; पिंपळगाव रेणुकाई सबस्टेशनमधील ट्रान्सफॉर्मरला आता 'कुलर'चा थंडावा!

### आमदार संतोष पाटील दानवे यांचा पुढाकार; अखंडित वीजपुरवठ्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई परिसरात सध्या मिरची पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड सुरू आहे. मात्र, एप्रिल-मे महिन्यातील वाढत्या उष्णतेमुळे वीज उपकेंद्रातील (सबस्टेशन) ट्रान्सफॉर्मर अतिगरम होऊन वारंवार बंद पडत आहेत. याचा मोठा फटका शेतीपंपाच्या वीजपुरवठ्याला बसत असून शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. ही बाब लक्षात घेता, आमदार संतोष पाटील दानवे यांनी पिंपळगाव रेणुकाई येथील सबस्टेशनमध्ये ट्रान्सफॉर्मर



थंड ठेवण्यासाठी तातडीने कुलर व इतर आवश्यक यंत्रणा बसविण्याचे निर्देश दिले आहेत.

तालुक्यात विशेषतः पिंपळगाव रेणुकाई परिसरात मिरची हे मुख्य नगदी पीक आहे. या कडक उन्हात मिरचीला नियमित पाणी देणे गरजेचे असते. परंतु, सूर्याच्या प्रखर उष्णतेमुळे आणि विजेच्या वाढत्या मागणीमुळे स ब स्ट`श न म धी ल ट्रान्सफॉर्मरची क्षमता संपून ते 'ओव्हरहीट' होत आहेत. ट्रान्सफॉर्मर गरम झाल्यामुळे तांत्रिक बिघाड होऊन वीजपुरवठा वारंवार खंडित होत होता. यामुळे ऐन उन्हाळ्यात पाणी असूनही वीज नसल्याने मिरचीची पिके कोमेजण्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या या समस्यांची दखल घेत आमदार संतोष पाटील दानवे यांनी संबंधित विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी पिंपळगाव रेणुकाई सबस्टेशनमधील ट्रान्सफॉर्मरला थंड ठेवण्यासाठी तातडीने कुलर बसवावेत, जेणेकरून यंत्रणा गरम होऊन बंद पडणार नाही. आमदार संतोष पाटील दानवे यांच्या या तत्पर निर्णयामुळे पिंपळगाव रेणुकाई परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

**काय होणार फायदा?**

अखंडित वीज: कुलरमुळे ट्रान्सफॉर्मरमधील ऑईलचे तापमान मर्यादित राहील, ज्यामुळे तांत्रिक बिघाड टळतील.

पिकांचे संरक्षण: वीजपुरवठा सुरळीत झाल्याने शेतकऱ्यांना मिरची पिकाला वेळेवर पाणी देता येईल.

यंत्रणेची सुरक्षा: ट्रान्सफॉर्मर जळण्याचे किंवा खराब होण्याचे प्रमाण कमी होऊन सरकारी मालमत्तेचे नुकसान टळेल. **-शाखा अभियंता मयूर बुलगे**

# लिंबागणेश राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात; कार-दुचाकी समोरासमोर धडकेत दोघांचा जागीच मृत्यू

## भालचंद्र विद्यालय परिसरातील 'मृत्यूचा सापळा' पुन्हा ठरला घातक; नागरिकांकडून गतिरोधक व सुरक्षा उपायांची मागणी

**लिंबागणेश** | दि. १६ मे

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी वर शुक्रवारी मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला. भालचंद्र विद्यालय परिसरात कार आणि दुचाकी यांच्यात समोरासमोर झालेल्या जोरदार धडकेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांनी महामार्गावरील वाढत्या अपघातांबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवार (दि. १५ मे) रोजी रात्री सुमारे पाऊणे बारा वाजण्याच्या सुमारास टाटा कंपनीची विस्टा कार (क्र. MH 05 AX 0388) आणि हिरो स्प्लेंडर दुचाकी (क्र. MH 44 AA 6226) यांच्यात समोरासमोर भीषण धडक झाली. धडक इतकी जबरदस्त होती की दुचाकीवरील दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर



दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. नेकनूर पोलीस स्टेशनचे सहायक फौजदार विठ्ठल राठोड आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली. जखमींना तातडीने जिल्हा रुग्णालय, बीड येथे हलविण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले.

या अपघातात मृत्यूमुखी पडलेले दुचाकीस्वार बबन काशिनाथ लगास आणि ज्ञानदेव विष्णू लगास (दोघे रा. चिखलबीड, ता. जि. बीड) असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे चिखलबीड गावावर शोककळा पसरली आहे.

दरम्यान, राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी वरील लिंबागणेश परिसरात वारंवार अपघात होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. विशेषतः भालचंद्र विद्यालय परिसरात वाहने भरधाव वेगाने धावत असल्याने हा भाग 'अपघातप्रवण झोन' बनला आहे. येथे तातडीने गतिरोधक बसविणे, वेगमर्यादा फलक उभारणे, रात्रीच्या वेळी प्रकाशव्यवस्था सुधारणे आणि वाहतूक नियंत्रणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# आईच्या बोलण्याचा राग मनात धरून दोन ठिकाणी अल्पवयीन मुलींनी घेतला गळफास

अंबाजोगाई : अंबाजोगाई शहरात व अंबाजोगाई तालुक्यातील मंगईवाडी गुरुवारी दोन हृदयद्रावक घटना उघडकीस आल्या असून यात दोन अल्पवयीन मुलींनी गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. आईने किरकोळ कारणावरून रागावल्याचा राग मनात धरून या मुलींनी हे टोकाचे पाऊल उचलल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या दोन्ही घटनांची नोंद स्थानिक पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

पहिली घटना अंबाजोगाई शहरातील माळी नगर भागात घडली. येथील रिद्धी अशोक चाटे या १४ वर्षीय मुलीला तिची आई कोणत्यातरी कारणावरून रागावली होती. याचा राग तिने मनात ठेवला. गुरुवारी आई बाहेरगावी गेलेली असताना रिद्धीने आपल्या वडिलांना आईस्क्रीम आणण्यासाठी बाजारात पाठवले. वडील घराबाहेर जाताच तिने राहत्या घरातील पंख्याला ओढणीने गळफास घेतला. वडिलांनी घरी परतल्यावर तिला तातडीने रुग्णालयात दाखल केले मात्र डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली असून जमादार बाबासाहेब आचार्य तपास करत आहेत.

दुसरी घटना अंबाजोगाई तालुक्यातील मंगईवाडी येथे घडली. येथे मयुरी माणिक गडदे या १५ वर्षीय मुलीने शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. घरात जनावरांच्या कामावरून आई रागावल्याचा राग आल्याने मयुरीने शौचास जाते असे सांगून घर सोडले आणि थेट शेतात जाऊन नायलॉनच्या दोरीने गळफास घेतला. मयुरीला चार बहिणी असून या घटनेमुळे गडदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक महेश भागवत या प्रकरणाचा तपास करत आहेत.

या अत्यंत दुर्दैवी घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांनी तरुण पिढीला आवाहन केले आहे. क्षुल्लक कारणावरून राग अनावर करून घेऊ नये, मानवी जीवन हे अत्यंत अमूल्य असून टोकाचा निर्णय घेण्यापूर्वी कुटुंबाचा विचार करावा, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

# आदर्श शिक्षक तथा साहित्यिक भागवत रामकृष्ण मसणे यांना पद्म पाणी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

अंबाजोगाई : श्री योगेश्वरी नूतन विद्यालयातील आदर्श सहशिक्षक तथा जेष्ठ साहित्यीक भागवत रामकृष्ण मसणे यांना पद्मपाणि प्रतिष्ठान बीड येथील आदर्श शिक्षक म्हणून राज्यस्तरीय पद्मपाणी पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या प्रतिष्ठाणद्वारे जानेवारी महिन्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींकडून आपले प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन पद्मपाणि प्रतिष्ठान द्वारे करण्यात आले होते. त्याच अनुषंगाने मागील २५ ते ३० वर्षापासून विविध शाळा महाविद्यालयातून स्नेहसंमेलन, निरोप समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, एन. एस. एस. शिबिर, पथनाट्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा वादविवाद स्पर्धा यासाठी परीक्षक म्हणून तर इतर वेळी स्नेहसंमेलनाचे उद्घाटक , अध्यक्ष, तर कधी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहण्याची संधी उपलब्ध झाली होती. अशा कार्यक्रमात ते शैक्षणिक ,सामाजिक व राजकीय व्यंग असलेले तास दीड तासाचे कार्यक्रम करत असत. भावगत मसने यांनी आजपर्यंत अनेक पथनाट्य लिहून विद्यार्थ्यां मार्फत सामाजिक प्रबोधनाचे कार्य केले आहे. आकाशवाणी बीड येथून त्यांची स्वलिखित गीते देखील प्रसिद्ध झाली



आहेत.

याअगोदरही भागवत मसने यांना माफत्यांना साहित्य क्षेत्रात त्याचबरोबर शिक्षक क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त झालेले आहेत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे १७ मे रोजी जितिन रहमान मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद बीड व इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांना पद्मपाणि आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. भागवत मसने यांना मिळालेल्या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# बीडमध्ये मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नावर मोठा निर्णय; आ. विजयसिंह पंडित यांच्या पुढाकाराने 50 लाखांचा निधी मंजूर

## शहरात उभारले जाणार मोकाट कुत्र्यांसाठी निवारा केंद्र; नसबंदी व लसीकरण मोहिमेला गती

**बीड** | प्रतिनिधी : बीड शहरातील वाढत्या मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर अखेर मोठी आणि दिलासादायक कारवाई सुरू झाली आहे. शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आ. विजयसिंह पंडित यांनी पुढाकार घेत मोकाट कुत्र्यांच्या निवारा केंद्रासाठी तब्बल ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे. हा निधी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून उपलब्ध झाला आहे.

शहरातील धानोरा रोडवरील पंढरी नगरी परिसरात मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव आणि त्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण





निर्माण झाले होते. अनेक सामाजिक संघटना आणि नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर आ. विजयसिंह पंडित यांनी या प्रश्नाची गंभीर दखल घेत ठोस निर्णय घेतल्याचे दिसून येत आहे.

राजीव गांधी चौकाजवळ उभारले जाणार निवारा केंद्र

नगरपालिकेच्या मालकीच्या जागेत, राजीव गांधी चौक परिसरात मोकाट कुत्र्यांसाठी आधुनिक निवारा केंद्र उभारण्यात येणार आहे. या केंद्रात कुत्र्यांची नसबंदी, लसीकरण आणि आवश्यक शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. त्यामुळे शहरातील मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रणात आणण्यास मोठी मदत होणार असल्याचे सांगितले जात आहे.

पालिका प्रशासनाला तातडीच्या सूचना

आ. विजयसिंह पंडित यांनी नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, मुख्याधिकारी शैलेश फडसे आणि पालिका पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेत तातडीने मोहिम राबवण्याच्या सूचना दिल्या. त्यांच्या निर्देशानंतर पालिकेने शहरात नसबंदी आणि लसीकरण मोहिमेला सुरुवात केली आहे.

पालिका प्रशासनाच्या माहितीनुसार, खंडेश्वरी रोड परिसरात आतापर्यंत ५०० हून अधिक मोकाट कुत्र्यांवर नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. आता शहरभर विशेष शोध मोहिम राबवून पुढील कारवाई केली जाणार आहे.

नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण

शासनाच्या निर्देशानुसार यापूर्वीच कारवाई होणे अपेक्षित असताना दुर्लक्ष झाल्याची टीका होत होती. मात्र आता नव्या पदाधिकाऱ्यांच्या पुढाकारामुळे प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे दिसत आहेत. शहरातील नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत आ. विजयसिंह पंडित शहर विकासासाठी "ॲक्शन मोड"मध्ये असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

# सात महिन्यांपासून मुलगी बेपत्ता; हतबल पालकांचा बीड एसपी कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न

बीड जिल्ह्यात एक धक्कादायक घटना समोर आली असून पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारात एका दाम्पत्याने अंगावर पेट्रोल-डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील हे जोडपे आपल्या १६ वर्षीय बेपत्ता मुलीच्या शोधासाठी गेल्या सात महिन्यांपासून पोलिसांकडे हेलपाटे मारत आहे. मात्र अद्याप मुलीचा शोध लागला नसल्याने हताश झालेल्या आई-वडिलांनी अखेर टोकाचे पाऊल उचलण्याचा प्रयत्न केला.

माहितीनुसार, सात महिन्यांपूर्वी एका तरुणाने या अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची तक्रार पिंपळनेर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. परंतु इतका



कालावधी उलटूनही मुलगी सापडलेली नाही. यामुळे संतप्त आणि निराश झालेल्या पालकांनी वारंवार पोलीस अधीक्षक कार्यालयात धाव घेतली. मात्र पोलिसांकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

शुक्रवारी बीडच्या पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारात या दाम्पत्याने अंगावर पेट्रोल-डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. यावेळी उपस्थित पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत त्यांना रोखले, त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. या घटनेनंतर पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून बेपत्ता मुलीचा शोध नेमका कधी लागणार, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, या घटनेमुळे बीड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून नागरिकांकडूनही संताप व्यक्त केला जात आहे.

# कोर्टाच्या निकालालाही केराची टोपली?

## शेतातून जबरदस्तीने रस्ता पाडत कुऱ्हाडीने जीवे मारण्याची धमकी; धोंडराईतील शेतकरी कुटुंब भयभीत

**गेवराई** | वार्ताहर

गेवराई तालुक्यातील धोंडराई येथे जमीन व रस्त्याच्या वादातून गंभीर प्रकार समोर आला असून, एका शेतकऱ्याच्या मालकीच्या शेतातून जबरदस्तीने रस्ता पाडत ट्रॅक्टर घालण्यात आल्याचा तसेच कुऱ्हाड घेऊन जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित शेतकऱ्याने थेट जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे धाव घेत न्याय व संरक्षणाची मागणी केली आहे.

धोंडराई येथील रहिवासी दिलीप पि. वसंतराव कुलकर्णी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या मालकी व ताब्यात असलेल्या सर्व्हे क्रमांक 259 मधील सुमारे 3 हेक्टर 70 आर जमिनीत कोणताही अधिकृत रस्ता नसताना, दिनांक 14 मे रोजी दुपारच्या सुमारास जबरदस्तीने ट्रॅक्टर घालून रस्ता पाडण्यात आला. यावेळी ट्रॅक्टर क्रमांक एमएच-29 बीसी 2284 घेऊन आलेल्या दिपक आसाराम निकम यांनी शेतातील बांध फोडत उत्तरेकडून दक्षिणेकडे मार्ग काढल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, "हा रस्ता का पाडत आहात?" असा जाब विचारताच हातात कुऱ्हाड घेऊन अंगावर धावून येत "याच रस्त्याने जाईल, अडवले तर जीवनातून संपवू," अशी उघड धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित शेतकरी कुटुंबामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रकरणात दिवाणी न्यायालयाने यापूर्वीच संबंधित सर्व्हे क्रमांक 259 मधून रस्ता काढू नये, असा निकाल दिलेला असल्याचा दावा कुलकर्णी यांनी केला आहे. मात्र न्यायालयीन आदेश असतानाही दिपक आसाराम निकम, सुवर्णा दिपक निकम, शंतनू दिपक निकम, समर्थ दिपक निकम व गोवर्धन आसाराम निकम हे संगनमत करून सातत्याने त्रास देत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# वाढदिवसानिमित्त प्रकाश बोरगावकर यांना "सायकल" भेट !

अंबाजोगाई : अंबाजोगाई येथील भाजपा कट्टर समर्थक प्रकाश बोरगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त सहकारी मित्रांनी "सायकल" भेट देऊन एक आगळा वेगळा संदेश देण्याचा प्रयत्न केला.

नुकत्याच काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधनाचा वापर कमी करा व सोने खरेदी थांबवा असे आवाहन आपल्या देशातील तमाम जनतेला केले होते. पंतप्रधान मोदी यांच्या आवाहनला भाजपा





कार्यकर्ते व समर्थकांकडून मोठा पाठिंबा मिळत आहे.नुकत्याच काही दिवसांपूर्वीच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारचा वापर न करता मोटार सायकल चालवत विधान सभेत प्रवेश केला होता.

अंबाजोगाई येथील भाजपा कट्टर समर्थक प्रकाश बोरगावकर यांना सायकल भेट !

भाजपाचे कट्टर समर्थक म्हणून ओळख असलेले प्रकाश बोरगावकर यांचा आज वाढदिवस आहे.गुड मॉर्निंग ग्रुप च्या वतीने त्यांना आज सायकल देवून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.आज पासून इंधनाला बायकट करीत सायकलचा जास्तीत जास्त वापर करण्यात यावा असा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासोबतच पंतप्रधान मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देण्यात यावा अशी प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.

यावेळी मिलिंद गायकवाड, फुलचंद सिरसाट,शशिकांत (नाना) गायकवाड, अजय राठोड, सचिन अंजान, तानाजी तपकिरे, शेख अन्वर, बालाजी शेरेकर यांच्या वतीने सायकल भेट देऊन प्रकाश बोरगावकर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.

# बीडचे अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांची बदली; धाराशिवमध्ये नवी जबाबदारी

बीड : मागील तीन वर्षांपासून बीड जिल्ह्यात अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असलेले सचिन पांडकर यांची अखेर बदली करण्यात आली आहे. त्यांची धाराशिव येथे अप्पर पोलीस अधीक्षक पदावर नियुक्ती झाली असून, त्यांच्या जागी बीडमध्ये कोणत्या अधिकाऱ्याची नियुक्ती होणार याकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



बीडमध्ये रुजू होण्यापूर्वी सचिन पांडकर यांनी मुंबई येथे मानवी हक्क अभियान विभागात पोलीस अधीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली होती. त्यानंतर तीन वर्षांपूर्वी त्यांची बीड जिल्ह्यात बदली झाली होती. या काळात जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेच्या अनेक संवेदनशील घटनांमध्ये त्यांनी संयमाने आणि प्रभावीपणे परिस्थिती हाताळत प्रशासनाला स्थैर्य दिले.

संयमी, मितभाषी आणि लोकाभिमुख अधिकारी अशी ओळख असलेल्या पांडकर यांनी बीड जिल्ह्यातील पोलीस यंत्रणेचा जनतेशी संवाद अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले. जिल्ह्यातील विविध गुन्हेगारी घटनांमध्ये त्यांनी घेतलेली भूमिका आणि प्रशासनातील समन्वय यामुळे त्यांना नागरिकांमध्ये विशेष लोकप्रियता मिळाली होती.

# साहित्य भारतीच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी प्रभाकर साळेगावकर तर कार्यवाहपदी डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर

**बीड (प्रतिनिधी)** | अखिल भारतीय साहित्य परिषद सलग्न साहित्य भारती देवगिरी प्रांत जिल्हा शाखा बीडच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध कवी प्रभाकर साळेगावकर तर कार्यवाह म्हणून उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर सरांची निवड करण्यात आली. अखिल भारतीय साहित्य परिषद संलग्न साहित्य भारतीचे देवगिरी प्रांत



मंत्री युवराज नळे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्याची साहित्य भारतीची नवीन कार्यकारणी निवडण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी प्रभाकर साळेगावकर, कार्यवाह - डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर,उपाध्यक्ष - सुरेश भानप, चंद्रकन्या सारसेकर जिल्हा मंत्री - डॉ. अनंत देशपांडे, संघटन मंत्री - प्रशांत भानप, डॉ. अशोक घोळवे, कोषाध्यक्ष - डॉ. रूपाली कुलकर्णी, कार्यालय प्रमुख - डॉ. सोपान सुरवसे, मार्गदर्शक - मधुकर वैद्य, स्नेहलताई पाठक, प्रचार प्रमुख - दत्ता आंबेकर, महिला प्रतिनिधी - मंजुषा कुलकर्णी, गौरी देशमुख, लता जोशी, वाचक प्रतिनिधी - द. ल. वारे, स्मिता लिंबगावकर, युवा प्रतिनिधी - शांभवी जगदीश कुलकर्णी ,कार्यकारिणी सदस्य - डॉ रमेश लांडगे, प्रा. सत्यप्रेम लगड, डॉ. श्रीमंत तोंडे, लक्ष्मण वाकडे,दीपक देशमुख, प्रमोद कुलकर्णी यांची निवड करण्यात आली.नवनिर्वाचित कार्यकारिणीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



शनी जन्मोत्सव भक्तांनी उत्साह साजरा केला दि.16 रोज शनिवार रोजी बीड येथील शनी मंदिरात भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला.

## अग्रलेख...

# एसआयआरच्या नव्या टप्प्यानिमित्त...

मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा निवडणूक आयोगाने केली आहे. ३ केंद्रशासित प्रदेश आणि १६ राज्यांत हे अभियान ३० जूनपासून राबवले जाणार आहे. हे अभियान स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन (एसआयआर) अर्थात विशेष सघन पुनरीक्षण म्हणून देशभर ओळखले जाते. या राज्यांतील ३६.७३ कोटी जनता या अभियानात सहभागी होणार आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक म्हणजे ९ कोटी ८६ लाख म्हणजे जवळपास १० कोटी लोकांचा त्यात समावेश होणार आहे. यानिमित्ताने फार मोठे शिवधनुष्य निवडणूक आयोगाने आपल्या हाती घेतले आहे. यापूर्वी बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या आधी हे अभियान राबवण्यात आले होते. ते वादग्रस्त ठरले होते, म्हणण्यापेक्षा ठरवून वादग्रस्त ठरवण्यात आले होते. आपल्या हक्काच्या मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यासाठी या अभियानाचा वापर करण्यात आल्याचा आरोप बिहार आणि पश्चिम बंगालमधील काही राजकीय पक्षांनी केला. पश्चिम बंगालमध्ये तर आपल्या पराभवाचे खापर ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने एसआयआरवर फोडले आहे. त्यांचा पवित्रा म्हणजे 'नाचता येईना अंगण वाकडे'सारखाच. पराभवाचे खापर निवडणूक आयोगावर फोडून तृणमूल काँग्रेसला फार काही साध्य करता येणार नाही. त्याऐवजी आपल्याकडून सत्तेत असताना कोणत्या चुका झाल्या, आपण अतिशय एकांगी पद्धतीने तर सरकार चालवले नाही ना, मुस्लिमांचे तुष्टीकरण करताना बहुसंख्य हिंदूंची आपल्याकडून उपेक्षा तर झाली नाही ना अशा विषयांचे आत्मपरीक्षण त्यांनी केले पाहिजे.

नवीन मतदारांची नावे मतदारयादीत समाविष्ट करणे, ज्यांची नावे एकापेक्षा जास्त मतदारसंघातील यादीत आहेत, त्यांची नावे वगळणे तसेच मृत मतदारांची नावे वगळणे हा या मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाचा मुख्य उद्देश. त्यामुळे त्यावर कोणाला हरकत घेण्याचे कारण नाही. निवडणूक आयोगाचा हेतू शुद्ध आणि प्रामणिक आहे. १ ऑक्टोबरला १८ वर्षांचे होत असलेल्या युवा मतदारांना आपली नावे मतदारयादीत नोंदवण्याचा मार्ग या अभियानामुळे प्रशस्त होणार आहे. ज्यांचा मृत्यू झाला, त्यांची नावे मतदारयादीतून वगळण्यात गैर काय आहे? हे काम तर सामान्य पद्धतीने आणि नेहमी व्हायला हवे. मृत्यू झालेल्या प्रत्येक व्यक्तीच्या निधनाचे प्रमाणपत्र स्थानिक स्वराज्य संस्थांचा जन्म आणि मृत्यू विभाग जारी करत असतो. ज्यावेळी त्या व्यक्तीच्या निधनाच्या प्रमाणपत्राची मागणी केली जाते, त्याचवेळी त्या व्यक्तीचे नाव संबंधित स्थानिक स्वराज संस्थेतर्फे मतदारयादीतून वगळले का जात नाही, हा प्रश्न आहेच. याकडेही आयोगाने लक्ष दिले पाहिजे. यावेळी महाराष्ट्रात हे अभियान राबवण्यात येणार आहे. महाराष्ट्रात सध्या कोणतीच निवडणूक नाही. विधानसभेच्या निवडणुकीला जवळपास तीन वर्षांचा अवधी आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे हे अभियान महाराष्ट्रात वादग्रस्त ठरेल, असे सध्या तरी वाटत नाही. महाराष्ट्रात या अभियानाचा संबंध राज्यातील विधानसभा निवडणुकीशी कोणाला जोडता येणार नाही. यापूर्वी महाराष्ट्रात २००२ मध्ये असे अभियान राबवण्यात आले होते. त्यामुळे हे काही आगळे घडत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. मतदारयाद्यांचे शुद्धीकरण म्हणून या अभियानाकडे पाहिले पाहिजे. मतदारयादीत या देशाचे नागरिक नसलेल्या कोणाचाही समावेश यापुढे होणार नाही, याची काळजी घेणे हे आयोगाचे कामच आहे. काही राजकीय पक्षांच्या मुस्लिम तुष्टीकरणाच्या धोरणातून ज्या घुसखोरांनी मतदारयादीत शिरकाव करून घेतला, त्यांची नावे मतदारयादीतून वगळण्यात काही गैर नाही. या देशाचा पंतप्रधान वा राज्याचा मुख्यमंत्री किंवा आमदार-खासदार निवडण्याचा अधिकार या देशातील मूळ नागरिकांचा आहे, घुसखोरांचा नाही. ज्यांनी बेकायदेशीर मार्गाने आधी देशात आणि नंतर मतदारयादीत घुसखोरी केली, त्यांना आधी मतदारयादीतून आणि नंतर देशातून हाकलून दिले पाहिजे. मात्र या मुद्यावरून कारण नसताना काही राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगावर हल्ला चढवीत त्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा तसेच तो केंद्र सरकारच्या तालावर नाचत असल्याचा आरोप केला हा मोठा विनोदच म्हटला पाहिजे.

देशात मुक्त आणि नि:पक्ष वातावरणात निवडणुका घेणे, ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. आपण तटस्थ आहोत आणि नि:पक्षपणे काम करत असल्याचे निवडणूक आयोगानेही आपल्या कृतीतून वेळोवेळी दाखवून दिले पाहिजे. मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणात काही चुका झाल्या तर त्या चुकांची कबुली देत आयोगाने त्या चुका तातडीने दुरुस्त केल्या पाहिजेत. सर्वांत खालच्या पातळीवर निवडणूक आयोगाने प्रतिनिधी म्हणून त्या गावातील शिक्षक आणि शासकीय सेवक काम करत असतात. ही सर्व मंडळी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडत असताना एखादवेळी काही चूक झाली, तर त्याची दुरुस्ती लगेच केली पाहिजे. या चुकीमागे कोणताही गैरहेतू नसला म्हणजे झाले. महत्त्वाचे म्हणजे हे अभियान राबवताना आयोगाने संबंधित राज्यातील सर्व राजकीय पक्षांना विश्वासात घेतले पाहिजे आणि त्यांच्या मदतीने आणि सहकार्याने हे अभियान राबवले पाहिजे. राजकीय पक्षांनीही एसआयआरच्या संदर्भात राष्ट्रप्रेमाची भूमिका घेण्याची परिपक्वता दाखविली पाहिजे. राजकारण होत राहील. देश राहिला तर सारे काही होईल. हा देशच घुसखोरांनी पोखरला तर निवडणुकांना अर्थ उरणार नाही, हे राजकीय पक्षांनी लक्षात घ्यावे. त्यामुळेच आयोगाच्या अशा कामांच्या पाठीशी उभे राहणे, हे सर्व राजकीय पक्षांचे तसेच कायदा आणि संविधानप्रेमी नागरिकांचे कर्तव्य आहे. ज्या पक्षांचे राजकारण मुस्लिम तुष्टीकरणावर विशेषत: बांगलादेशी घुसखोरांवर अवलंबून होते, त्या राजकीय पक्षांनी आणि ममता बॅनर्जींसारख्या नेत्यांनी या घुसखोराचे अवाजवी आणि अनावश्यक लाड केले. राजकीय स्वार्थ साधताना आपण देशाची एकता आणि अखंडता धोक्यात आणत आहोत, याचे भानही त्यांना राहिले नाही. ममता बॅनर्जींनी आपल्या राजकीय फायद्यासाठी बांगलादेशी घुसखोरांचे तुष्टीकरण करताना निष्पाप हिंदूंचा छळ केला. त्याची किंमत त्यांना चुकवावी लागली हे पश्चिम बंगालच्या निकालांनी स्पष्ट केले. नियमित कालावधीने सर्व गोष्टींची स्वच्छता करणे आवश्यक असते. घर, शरीर, वस्तूंची सफाई आपण करतोच. मतदारयाद्या या नियमाला अपवाद असू शकत नाहीत. मात्र, हे अभियान राबवताना कायद्यातील एका तत्त्वाचे भान संबंधित यंत्रणांनी ठेवणे गरजेचे आहे. शंभर अपराधी सुटले तरी चालतील, पण एकाही निरपराध व्यक्तीला शिक्षा होऊ नये, असे कायद्याचे तत्त्व आहे. ते लक्षात ठेवून कोणत्याही योग्य आणि पात्र व्यक्तीचे नाव मतदारयादीतून वगळले जाऊ नये, ही काळजी घेण्याची जबाबदारी निवडणूक आयोगासोबत संबंधित व्यक्ती आणि त्या भागातील राजकीय पक्षांचीही आहे. राजकीय पक्षांनीही या अभियानावर वाद उपस्थित न करणे देशहिताचे ठरेल. आपल्याला अनुकूल असलेल्या मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्याचा प्रयत्न निवडणूक आयोगाने केल्याचा आरोप पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसने केला होता. तृणमूल काँग्रेसच्या या आरोपात तथ्य नसल्याचे त्या राज्यातील विधानसभा निवडणूक निकालातून दिसून आले आहे. ज्या मतदारसंघातून काही लाख मतदारांची नावे वगळल्याचा आरोप झाला, अशा अनेक मतदारसंघात तृणमूल काँग्रेस विजयी झाली आहे. मात्र, वाद व्हायचा तो झालाच. आता देशातील १६ राज्यांत हे अभियान राबवताना, त्या राज्यांतील कोणत्याही राजकीय पक्षाला असा आरोप करण्याची संधी मिळणार नाही, याची काळजी आयोगाने घेतली पाहिजे.

मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. देशाच्या एकता आणि अखंडतेशी जोडलेला तो एक मुद्दा आहे, याचे भान सर्वांनी ठेवले पाहिजे. व्यक्तीपेक्षा समाज मोठा आणि समाजापेक्षा देश मोठा ही जाणीव आपल्या मनात रुजवली तर देशासमोरील बरेच प्रश्न सुटू शकतात. त्यामुळे मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाचा निवडणूक आयोगाचा आदेश राजकीय पक्षांनी व नागरिकांनी 'सर आँखों'पर घेतला पाहिजे. ▌

## प्रासंगिक

डॉ. विनय कृ. देशपांडे

# वैदिक अनुसंधान केंद्र (वेद विद्यालय) संस्कार ऊर्जाकेंद्र

**(शनिवार, १६ मे २०२६ ला वैदिक अनुसंधान केंद्र (वेद विद्यालय) च्या नूतन वेद भवन आणि ऐतिहासिक अष्ट विकृती महाग्रंथांचा लोकार्पण समारोह संपन्न होत आहे. त्यानिमित्ताने गेल्या १८ वर्षांतील केंद्राच्या प्रगतीचा आढावा.)**

प्राचीन काळापासूनच भारतात, सुसंस्कारित समाजनिर्मितीसाठी शिक्षणाला महत्त्वाचे मानले गेले आहे. त्यामुळे कालौघाप्रमाणे शिक्षणव्यवस्था निर्माण होत गेल्यात. तसेच विविध प्रकारचे शिक्षणही निर्माण होत गेले. आज डिजिटल शिक्षण उपलब्ध आहे. ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या पण त्यातील संस्कार, आत्मीयता लुप्त झालेली आहे.

व्यक्तीच्या शिक्षणाची सुरुवात प्रथमतः त्याच्या घरापासूनच होत असते. 'आई' ही प्रथम शिक्षक-गुरू असते. कालांतराने विविध शिक्षण प्राप्त करण्यासाठी पूर्वी 'गुरुकुल'मध्ये जावे लागत असे. तेथे त्याचे शरीर, मन, बुद्धी व अध्यात्मशक्ती विकसित करणारे शिक्षण देण्यात येत असे. 'वेद' शिक्षण हा त्या काळातील महत्त्वाचा भाग होता. व्यक्तीला वाचन, पठन, मनन, चिंतन अशा विविध प्रक्रियांतून शिक्षण दिले जात असे. त्यासाठी अनेक 'आश्रम' (गुरुकुल) म्हणजेच विद्यालये होती. परंतु, परकीय आक्रमणामुळे व स्वकीयांच्या दूरदृष्टीच्या अभावामुळे वेद शिक्षण व्यवस्थेचा ऱ्हास होत गेला.

तरीही काही वेदमूर्तींमुळे वेद शिक्षणाचा झरा पूर्णपणेआटला नाही. गेल्या काही वर्षांपासून भारतात वेद शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन अनेक व्यक्ती व संस्था पुढे आल्यात व त्यांनी वेद शिक्षणव्यवस्था निर्माण करण्यास सुरुवात केलेली आहे. त्याद्वारे नवीन पिढीला वेद विषयाकडे वळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भारतात पूर्वी वेदांच्या अनेक शाखा होत्या. त्यासोबत ग्रंथ, ब्राह्मण आरण्यक, उपनिषद आदी ग्रंथांचा सागर होता. या शाखा होय. पूर्वी या शाखेचे घनपाठ अध्ययनाचे कार्य महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर होत होते. विदर्भातही या वेद शाखेचे जवळपास शंभर घनपाठी होते. परंतु, कालांतराने ही संख्या हळूहळू कमी होत गेली. पण अलिकडेच या वेदशाखेचे शिक्षण देणारी एक संस्था नागपूर येथे स्थापन झालेली आहे. ही संस्था म्हणजेच वैदिक अनुसंधान केंद्र (वेद विद्यालय) होय. हे वेद विद्यालय श्रद्धेय किशोरजी व्यास (श्रद्धेय स्वामी गोविंदगिरी महाराज) यांच्या प्रेरणेने व आशीर्वादाने सुरू झालेलेआहे. आधुनिक काळातही वेदाचे शिक्षण देणारी ही एक वैशिष्ट्यपूर्ण संस्था आहे. नागपूरला २००८ मध्ये एका लहानशा खोलीत, वेदमूर्ती प्रवीण लिगदे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली, केवळ पाच विद्यार्थी वेद अध्ययन करीत आहेत. या वेद विद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला संलक्षण घनपाठी शिक्षणाव्यतिरिक्त औपचारिक व व्यावसायिक शिक्षणही तसेच पौराहित्य - संहिता यांचे शिक्षण दिले जाते. वेदांचेअध्ययन करण्यासाठी बारा ते पंधरा वर्षे लागतात. यात संहिता अध्ययन तीन वर्षे, ब्राह्मण आरण्यक दोन वर्षे, पदपाठ अध्ययन दोन वर्षे, घनपाठ अध्ययन दोन वर्षे, उपनिषद दोन वर्षे याशिवाय संस्कृत, व्याकरण, वैदिक व्याकरण, निरुक्त, छंद मीमांसा, वेदांत यासाठी तीन वर्षे लागतात.

या वेद विद्यालयाद्वारे अष्टविकृती महाग्रंथांचे (जटा, माला, शिखा, रेखा, ध्वज, दंड, रथ, घन इ.) भारतात प्रथमच प्रकाशन होत आहे.

या वैदिक केंद्रात प्रवेशित विद्यार्थ्याचे वय साधारणतः आठ ते बारा वर्षेपर्यंत आहे, पण यासाठी वयाची कोणतीही मर्यादा नाही. प्रवेशित विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही. त्यांचा संपूर्ण खर्च संस्था करीत असते. यासाठी सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव असलेल्या व्यक्ती यथायोग्य मदत करीत असतात. या वैदिक केंद्रात जे विद्यार्थी संहिता पूर्ण करून आले होते, त्यांनी आठ वर्षे पुढील शिक्षण घेतले. ते पुणे, तिरुपती, कांचीपुरम येथील परीक्षा देऊन उत्तमरीत्या उत्तीर्ण झालेत. हेच विद्यार्थी नागपूर, रामटेक, चेन्नई येथे वेद शिक्षणाचे अध्यापक म्हणून कार्यरत आहेत. या वेद विद्यालयात प्रमुख सुवर्णपदक प्राप्त वेदमूर्ती प्रवीण लिंगदे गुरुजी यांच्यासह वे. मू. सर्वश्री आदित्य कुळकर्णी, प्रथमेश निर्मल, सचिन बाभूळगावकर आणि लीलाधर शर्मा (हे वेदांमध्ये पीएच. डी. करीत आहेत) असे पाच शिक्षक अध्यापनाचे कार्य करीत आहेत.

वैदिक केंद्रात येणाऱ्या विद्यार्थ्याला सुसंस्काराचे शिक्षण दैनंदिन कार्यातून मिळते. विद्यालयाची दिनचर्याही वैशिष्ट्यपूर्ण आहे. पहाटे ४ वाजता सुरू झालेली दिनचर्या रात्री १० वाजता संपते. यात वेद प्रार्थना, वेदाभ्यासाबरोबर भोजन, विविध खेळ, उपासना, संध्या इ. गतिविधी केल्या जातात. या दिनचर्येत संस्कृत, इंग्रजी व संगणक विषयाचे अध्यापनही उत्कृष्ट अध्यापकांद्वारे केले जाते. तसेच स्वावलंबनाचे धडेही दिले जातात. प्रत्येकातील सुप्त गुणांना विकसित करण्याची संधी दिली जाते. जेव्हा हे वैदिक अनुसंधान केंद्र (वेद विद्यालय) लक्ष्मीनगरमधील श्री सिद्ध हनुमान मंदिरात स्थानांतरित झाले, तेव्हा तेथील रहिवासी व समाजाचेही सहकार्य प्राप्त होऊ लागले. याच विद्यालयाने २८ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०१६ या कालावधीत शुक्ल यजुर्वेद काण्व शाखेचे संपूर्ण घन पारायणाचा कार्यक्रम भव्य स्वरूपात आयोजित केला होता. यात संपूर्ण महाराष्ट्रातील जवळपास एक हजार वेद शिक्षक व विद्यार्थी आणि वेदप्रेमी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या समारोपीय समारंभात रा. स्व. संघाचे प. पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, श्रद्धेय स्वामी गोविंदगिरी देव महाराज, जितेंद्रनाथ महाराज यांचे मार्गदर्शन लाभले. याच कार्यक्रमाच्या एक दिवस आधी करवीर पीठाचे शंकराचार्य प. पू. नरसिंह भारती यांनी भेट दिली. तसेच वैदिक संमेलन २०१९ मध्ये घेण्यात आले. त्या संमेलनात भारतातील गणमान्य १०० वैदिक घनपाठींचा सहभाग होता. या संमेलनाचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री नितीन गडकरी होते. हे वेद विद्यालय, महर्षी सांदीपनी राष्ट्रीय संस्कृत शिक्षा बोर्ड, उज्जैनतर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी केंद्र म्हणून मान्यताप्राप्त आहे. वेद शिक्षण घेणारे विद्यार्थी या परीक्षा देऊ शकतात. उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना बोर्डातर्फे बारावी समकक्ष प्रमाणपत्र देण्यात येते. वैदिक अनुसंधान केंद्र नरेंद्रनगर नंतर दीनदयालनगर वास्तूत स्थानांतरण केल्यानंतर वेद शिक्षणासमवेत औपचारिक शालेय शिक्षणही विद्यार्थ्यांना देण्यात येते. या वेद विद्यालयाच्या कार्यक्रमांमुळे सभोवतालच्या परिसरातील समाजात सुसंस्कारांचे वातावरण निर्माण होत आहे. वेद पठनामुळे निर्माण होणाऱ्या ऊर्जेचा एक सकारात्मक परिणाम समाजावर होत असतो. अलिकडेच संपूर्ण जगात वेदांवर जे संशोधन चालले आहे त्यातील जवळपास ५० टक्के संशोधनाचा मुख्य विषय 'वेद पठनातून निर्माण होणारी ऊर्जा' हा होय.

वेद शिक्षणाची आधुनिक काळात गरज काय? ते शिक्षण घेतल्याने शिक्षित विद्यार्थ्यांचा लाभ काय? त्यांचे भवितव्य काय? असे अनेक प्रश्न विचारले जातात. वास्तविक कोणत्याही देशाची प्रतिमा, विकास व त्या देशातील जनसंख्या कशी आहे, यावर अवलंबून असते. त्यामुळेच सुसंस्कृत, संवेदनशील समाजरचना सातत्याने राहावी यासाठीच वेद शिक्षण महत्त्वाचे. वेद अभ्यासक, वेदमूर्ती, वेदशिक्षित व्यक्तींची संख्या वाढली तर समाजात सकारात्मकतेची बीजं रुजू होतील. रोजगार मागणाऱ्यांपेक्षा रोजगार देणाऱ्यांची संख्या अधिक असणे कोणत्याही देशाच्या दृष्टीने आवश्यक असते. स्वयंरोजगार संख्या महत्त्वाची असते. यासाठीच वेदशिक्षण महत्त्वाची भूमिका बजावू शकते. सर्व दृष्टीनेच वेद शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊनच वैदिक अनुसंधान केंद्र कार्य करीत आहे. म्हणूनच, संपूर्ण समाजाला सुसंस्कारित करण्याचे कार्य करणाऱ्या व त्यातून निर्माण होणाऱ्या ऊर्जेचा सुपरिणाम करणाऱ्या यासारख्या केंद्रांची आज आवश्यकता आहे. वेद शिक्षणाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी, त्याचे देशाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासातील महत्त्वाचे स्थान लक्षात घेता, शासन, सामाजिक संस्था व अन्य संस्थांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. ▌

९८५०३१३३२९

## स्मरण


अच्युत गोडबोले

# आनंद कभी मरते नहीं...

माझ्या आयुष्यात सतत आनंद पेरणारा माझा अत्यंत जवळचा चाळीस वर्षांचा मित्र आनंद आज माझा हात सोडून गेला यावर विश्वासच बसत नाहीये. त्याचं मोठं ऑपरेशन होणार आहे, त्यानंतर ऑपरेशन चांगलं झालं आणि त्यानंतर त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याच्या अनेक बातम्या आणि अपडेट्स आयपीएचकडून सतत मिळत होते. पण हे ऑपरेशन गुंतागुंतीचं होतं आणि त्यामुळे अचानक प्रकृती बिघडून आनंद आपल्याला सोडून निघून गेला.

१९८० च्या दशकात जेव्हा माझा मुलगा निहारला ऑटिझम डिटेक्ट झाला, तेव्हा डॉ. राजेंद्र बर्वे या सुप्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञानं त्याचं प्रथम निदान केलं होतं. त्यावेळी माझ्यासकट अनेकांनी ऑटिझम हा शब्दच ऐकलेलाच नव्हता. त्यामुळे राजेंद्रच्या रूममधून बाहेर येताना हा काहीतरी किरकोळ प्रकार असेल आणि थोड्याशा गोळ्या घेऊन बरा होईल, असं मला पहिल्यांदा वाटत होतं. त्यावेळी दादरला राजेंद्रच्याच जवळ आनंद प्रॅक्टिस करत होता. त्याच्याकडे मी जाऊन ऑटिझम म्हणजे काय एवढंच विचारलं. त्यावेळी आनंदनं मला त्याची पूर्ण कल्पना दिली आणि मी हादरूनच गेलो. तो क्षण माझ्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला आणि पूर्णपणे गर्तेत गेलेला मी आयुष्यात पुन्हा उभा राहिलो. हे सगळं राजेंद्र आणि आनंद यांच्यामुळेच शक्य झालं.

त्यानंतर आनंदच्या माझ्या गाठीभेटी अनेक वेळा होत गेल्या. माझ्या किमयागार पुस्तकाचं प्रकाशन अभिनेत्री रीमा हिच्या पुढाकारानं डॉ. वसंत गोवारीकर यांच्या हस्ते झालं होतं. त्यावेळी संगीत, साहित्य, रंगभूमी, चित्रपट आणि विज्ञान या क्षेत्रातले अनेक दिग्गज हजर होते. त्यातही आनंद माझ्यासाठी ठाण्याहून माझं कौतुक करायला हजर होता याचं मला केवढं अप्रूप होतं! माझ्या लिखाणाला तो सतत प्रोत्साहन देत असे. माझ्याबद्दल मनापासून बोलत असे.



मनोविकारांवर मनकल्लोळ नावाची दोन पुस्तकं मी नीलांबरी जोशीबरोबर लिहिली. ती लिहिल्यानंतर त्यात टेक्निकल काही चूक राहू नये म्हणून ती आनंदला वाचायला दिली होती. त्यानंतर त्याच्या घरी अनेक तास आम्ही चर्चा केली तेव्हा त्याच्या त्या विषयाच्या सखोल ज्ञानाची झलक आम्हाला बघायला मिळाली. शिवाय, एवढ्या व्यस्त दिनक्रमात त्यानं त्या पुस्तकाची ओळन्‌ओळ वाचली होती याचं मला प्रचंड आश्चर्य वाटत राहिलं. ते पुस्तक आज प्रचंड लोकप्रिय झाल्याचं खूप मोठं श्रेय मी आनंदलाच देईन.

एकाच वेळी अतिशय ज्ञानी आणि लोकाभिमुख मनोविकारतज्ज्ञ, लेखक, उत्कृष्ट वाचक, कवी, गायक, नाटककार, वक्ता, सामाजिक कार्यकर्ता, छायाचित्रकार, कॉर्पोरेट ट्रेनर, संत वाङ्मयाचा सखोल अभ्यासक हे सगळं असणं ही जवळपास अशक्य गोष्ट फक्त आनंदच करू जाणे! त्यानं लहान मुलांपासून अनेक विद्यार्थी आणि माणसं यांच्यावर सामाजिक संस्कार व्हावेत म्हणून ठाण्यामध्ये 'वेध' या नावानं कार्यक्रम करायला सुरुवात केली. ते इतके लोकप्रिय झाले की नंतर ते मोठ्या पटांगणावर व्हायला लागले. अनिल अवचट आणि आनंद यांनी व्यसनमुक्तीसाठी पुण्यामध्ये मुक्तांगण चालू केलं आणि त्यासाठी आनंदनं सुद्धा अनिलबरोबर प्रचंड श्रम केले आणि योगदान दिलं. दोन तीन वेळेला मुंबईहून पुण्याला रेल्वेनं जाताना मला आनंद गाडीत भेटला होता. कुठे चाललास, असं विचारलं तर मी मुक्तांगणला नेहमी जातो, असं त्यानं सांगितलं. हा टाईम मॅनेजमेंट केव्हा आणि कसं करतो याचं मला नेहमीच कोड पडे.

त्याची मानसशास्त्रावर आणि भावनांवर तसंच आरईबीटीवरची व्याख्यानं म्हणजे बौद्धिक आणि भावनिक पर्वणीच असे. तो अनेक धर्मातले तसंच संत वाङ्मयातले इतके संदर्भ द्यायचा की हा मनोविकारतज्ज्ञ किंवा मनोविकासतज्ज्ञ आहे की संत वाङ्मयाचा गाढा अभ्यासक आहे हेच कळायचं नाही. तो उत्कृष्ट नाटककारही होता. त्याचं सगळ्यात शेवटचं नाटक म्हणजे लॉस्ट सपर. हे नाव सुद्धा लास्ट सपर वरून घेतलेलं होतं, कारण याला ख्रिश्चन धर्मामध्ये खूप महत्त्व होतं आणि त्यावरूनच अनेक प्रसिद्ध चित्रकारांनी याच नावाची चित्रंही काढली होती. आनंदचं नाटक मात्र विवेकानंदांच्या आयुष्यातल्या आणि स्वभावातल्या वेगळ्याच छटांवर प्रकाश पाडत होतं. आनंदनं मला फोन करून ते बघायला बोलवलं होतं. ते इंग्रजीतलं नाटक अतिशय उत्कृष्ट तऱ्हेनं सादर केलं होतं. काही दिवसांपूर्वी त्यानं हिंदी सिनेमातली गाणी आणि वेगवेगळ्या भावना यांची सांगड घालणारा एक कार्यक्रम पुण्यामध्ये यशवंतराव चव्हाणमध्ये केला होता. कार्यक्रम संपल्यावर टाळ्यांचा कडकडाट थांबलाच नाही आणि नाट्यगृहातल्या सगळ्या लोकांनी उभं राहून त्याला मानवंदना दिली होती. एवढं सगळं चालू असताना त्यानं इन्स्टिट्यूट फॉर सायकॉलॉजिकल हेल्थ म्हणजेच आयपीएच ही संस्था काढली आणि ती मुंबई आणि पुणे इथे समर्थपणे चालवली. हजारो मनोरुग्णांना सल्ला आणि औषध देणं हे काम या संस्थेनं केलं आणि अजूनही करत आहे. आत्महत्येपासून परावृत्त करण्याकरिता २४ तासांची हेल्पलाईन चालू करण्यापासून अनेक उपक्रम तो त्यात राबवत असे आणि एवढं करून रोज तो त्याची ओपीडी मात्र कधी चुकवत नसे. हे सगळं अजबच!

गेल्या वर्षी मला ७५ वर्षे पूर्ण झाली तेव्हा त्या कार्यक्रमात डॉ. अनिल काकोडकर आणि आनंद यांना प्रमुख पाहुणे आणि अध्यक्ष म्हणून बोलवलं होतं. त्यावेळी सुद्धा आनंद माझ्याविषयी जे चांगलं बोलला, ते ऐकून मला हर्षवायूच झाला होता. आनंद रसरशीत आयुष्य जगला. खरं म्हणजे त्याच्या आयुष्यात खूप संघर्ष होता. लहानपणीच झालेला पोलिओ, त्यानंतर आलेल्या अनेक शारीरिक व्याधी, वैयक्तिक आयुष्यात आलेले अनेक कटू प्रसंग आणि चढ-उतार, मध्येमध्ये येणाऱ्या आर्थिक अडचणी अशा अनेक अडचणींमधून हा मनुष्य वाट काढतो आहे असं त्याला भेटणाऱ्या कोणालाच कळणं शक्य नव्हतं इतका तो सतत आनंदी असे.

आज आनंद आपल्यात नसला तरी तो लोकांच्या हृदयावर कायमच कोरलेला असेल यात शंकाच नाही. त्याला कदापि विसरणं शक्य नाही. कारण आनंद कभी मरते नहीं हेच खरं! ▌

## मुंबई वार्तापत्र


नागेश दाचेवार

# नाकर्त्यांची जळजळ!

ज्यांच्या राजकारणाचा पायाच मुळात नैराश्य, गद्दारीचे रडगाणे आणि केवळ वैयक्तिक टीकेवर आधारलेला आहे, त्यांच्याकडून देशाच्या हिताच्या धोरणांची स्तुती होण्याची अपेक्षा करणे म्हणजे गाढवाकडून सुरेल गायनाची अपेक्षा करण्यासारखे आहे. ज्यांच्या घरात घुसून बसण्याच्या सवयीचे एकेकाळी वाभाडे काढले गेले, त्यांच्या मालकीच्या मुखपत्राची ओळख आता केवळ आणि केवळ 'ऊर बडवेगिरी' आणि 'वैफल्याचे डोस' देणारे पत्रक एवढीच उरली आहे. त्या पत्रकातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परदेश दौऱ्यावर आणि त्यांच्या काटकसरीच्या आवाहनावर जी चिखलफेक करण्यात आली आहे, ती त्यांच्या बौद्धिक, वैचारिक दारिद्र्याची साक्ष देते.

**'वर्क फ्रॉम होम' मुख्यमंत्री आठवतात? :** पंतप्रधानांच्या काटकसरीवर आणि दौऱ्यांवर बोट ठेवणाऱ्या संजय राऊत यांनी आधी आपल्या मालकाचा इतिहास चाळावा. रोज सकाळी नऊ वाजता कॅमेऱ्यासमोर येऊन पोपटासारखी बडबड करणाऱ्या राऊतांना विसर पडला असेल, पण महाराष्ट्रातील जनता तो काळा कालखंड कधीच विसरू शकत नाही. जेव्हा संपूर्ण देश आणि महाराष्ट्र कोरोना महामारीच्या महाभयंकर संकटाशी दोन हात करत होता, जनता हवालदिल होती, राज्याचे अर्थचक्र ठप्प झाले होते आणि लोक हक्काच्या मुख्यमंत्र्यांकडे आशेने पाहत होते, तेव्हा यांचे 'लाडके' मुख्यमंत्री उद्धव ठाकरे 'मातोश्री'च्या एसी खोलीत लपून बसले होते.

कोरोनाच्या भीतीने घराबाहेर न पडता, केवळ 'फेसबुक लाईव्ह'वरून 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी'चे तुणतुणे वाजवून संपूर्ण राज्य सांभाळू पाहणारे त्यांच्यासारखे तेच. मंत्रालयाची पायरी न चढता, जनतेला वाऱ्यावर सोडून घरातून सरकार चालवणाऱ्या या 'फेसबुक मुख्यमंत्र्यांना' महाराष्ट्रातील जनतेने उद्वेगाने आणि संतापाने 'घरकोंबडा' ही पदवी बहाल केली होती, याची आठवण आज संजय राऊत यांना आहे का? ज्यांच्या नेतृत्वाने संकटाच्या काळात जनतेच्या पाठीशी उभे राहण्याचे धाडस दाखवले नाही, ज्यांनी केवळ 'वर्क फ्रॉम होम' करून राज्याची वाट लावली होती, ते मुख्यमंत्री त्यांना आठवतात काय, हा खरा प्रश्न. यापूर्वी या 'फेसबुक मुख्यमंत्र्यांनी' राज्यातील शेतकऱ्यांना शेती 'वर्क फ्रॉम होम' करण्याचा सल्ला देऊन मोठा पराक्रम केला होता. त्यांच्या तोंडून अहोरात्र, २४ तास देशासाठी धावणाऱ्या आणि संकटसमयी थेट सीमेवर सैनिकांसोबत दिवाळी साजरी करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका व्हावी, हा या शतकातील सर्वांत मोठा विनोद आहे!



**'टोमणे गँग'ला फक्त 'हप्तेखोरी' समजणार! :** पंतप्रधान मोदींनी देशातील जनतेला इंधनाची बचत करण्याचे आणि काटकसरीचे जे आवाहन केले, तो सुजाण राष्ट्रप्रमुखाचा देशाप्रति असलेला प्रामाणिक दृष्टिकोन आहे. संकटसमयी देशाने एकत्र यावे, ही भारतीय संस्कृती आहे. पण, ज्यांना केवळ 'चेष्टा करणे' एवढेच समजते, त्यांना या आवाहनामागील राष्ट्रीय भावना कशी समजणार? निवडणुकांमध्ये पैसे उडवले, रॅली काढल्या म्हणून पंतप्रधानांनी काटकसरीचे ज्ञान शिकवू नये, असा अजब जावईशोध या बौद्धिक दिवाळखोरांनी लावला आहे. लोकशाहीच्या उत्सवात जनतेपर्यंत पोहोचणे आणि देशाच्या आर्थिक शिस्तीसाठी धोरणे आखणे, या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत, हे समजण्याइतके शहाणपण उबाठा गटाच्या नेत्यांकडे शिल्लक राहिलेले नाही. कोरोनाच्या काळात ज्यांनी 'खिचडी घोटाळा' आणि 'बॉडी बॅग घोटाळा' करून मृतांच्या टाळूवरील लोणी खाल्ले, त्यांनी आर्थिक शिस्तीच्या गप्पा मारणे म्हणजे शुद्ध ढोंगीपणा आहे.

**'गल्लीतल्या' नेत्यांचे भाष्य :** अमेरिकेच्या दबावामुळे मोदी रशियाकडून स्वस्त गॅस घेत नाहीत, असा अत्यंत बालिश आणि खोटा आरोप हे लोक करत आहेत. संभ्रम पसरविण्याचा प्रयत्न करत आहेत. संपूर्ण जगाने पाहिले आहे की, युक्रेन युद्धाच्या काळात जेव्हा संपूर्ण जगाने रशियावर निर्बंध लादले होते, तेव्हा केवळ आणि केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वामुळे भारताने अमेरिकेच्या दबावाला झुगारून रशियाकडून सवलतीच्या दरात कच्चे तेल आणि गॅस खरेदी केला. हा भारताचा आंतरराष्ट्रीय विजय होता. पण, ज्यांचे राजकारण केवळ मुंबई महापालिकेच्या कंत्राटांभोवती आणि 'वझे'शाहीच्या हप्तेखोरीभोवती फिरते, त्यांना जागतिक पातळीवरील 'भू-राजकारण' 'अर्थकारण'काय समजणार?

**टोमणे गँगचे दुकान आता बंद होणार! :** 'ईव्हीएम'मध्ये कमळाबाईला कोंबून संकट दूर होणार नाही, अशी भाषा वापरणाऱ्यांना हे ठावूक असावे की, जनतेने तुम्हाला तुमच्या घरात बसून राहण्याच्या कर्मामुळे नाकारले आहे. महापालिकेतून होणारी मुंबईकरांच्या पैशांची लूट बंद झाल्यामुळे आणि सत्तेची ऊब गेल्यामुळे जी तडफड सुरू आहे, ती वेगवेगळ्या माध्यमातून बाहेर पडत आहे. त्यामुळे कितीही जळजळ व्यक्त केली तरी जनतेचा गैरसमज होणार नाही, हे नक्की. नाकर्ते म्हणूनच या जळजळ करणाऱ्यांना जनतेने वारंवार नाकारले हेच सत्य आहे आणि कर्ते काय करू शकतात, हे सारा महाराष्ट्र पाहतोय. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस आणि महायुतीचे सरकार आल्यापासून कोट्यवधींच्या गुंतवणुकीचा महाधडाका सुरू झाला आहे. तरुणांना प्रत्यक्ष रोजगार मिळत आहेत. पाणलोट क्षेत्राला बळ, दमणगंगा-गोदावरी, नळगंगा-वैनगंगा, पारगोदावरी यासारख्या नदीजोड प्रकल्पांसाठी चालना, 'मुळा-मुठा'सारख्या रखडलेल्या नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांना गती मिळत आहे. मिठी नदीची वाट लावणाऱ्यांना ही विकास कामे डोळ्यांनी पाहण्याचे आणि त्याचे स्वागत करण्याचे औदार्य कसे होईल? हे सगळे बघून त्यांची जळजळच होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश प्रगतिपथावर आहे आणि जगभरात भारताचा डंका वाजतोय. विरोधकांच्या छातीत यामुळे धडधड होत आहे. मात्र, उबाठा गटाने कितीही जळजळ व्यक्त केली, तरी स्वतःच्या घरातून बाहेर पडून देशासाठी धावणाऱ्या नेतृत्वाची बरोबरी हे कधीच करू शकत नाहीत. ▌

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### वर्क फ्रॉम होमची मर्यादा

कोरोना महामारीपासून अनेकांना वर्क फ्रॉम होमच्या मंत्राची सवय झालेली आहेच आणि त्यामुळे वेळ, ऊर्जा, इंधनाची बचत होऊन कामेही गतिशील होतात; परंतु शिक्षणाच्या बाबतीत हा मंत्र योग्य वाटत नाही. गुरुकुलात अर्थात शाळा, महाविद्यालयात गुरुमुखातील शिक्षण हेच संस्कृतीने प्रमाण मानलेले आहे. त्यामुळे घरी बसून इंटरनेट अथवा मोबाईलवरील शिक्षण सार्थ वाटत नाही व शारीरिकदृष्ट्या मुलांना हानिकारकच ठरते. तेव्हा पंतप्रधानांनी किमान शैक्षणिक बाबतीत वर्क फ्रॉम होमच्या मंत्रापासून विद्यार्थ्यांना दूर ठेवणे उचित वाटते. कारण शेवटी प्रत्येक गोष्टीची लक्ष्मणरेषा असतेच.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### अफगाणिस्तान-पाकिस्तानातील वाढता संघर्ष चिंताजनक

जेव्हापासून अफगाणिस्तानमध्ये तालिबान सत्तेवर आले आहे तेव्हापासून त्यांचा पाकिस्तानबरोबर संघर्ष वाढतच चालला आहे. ज्या पाकिस्तानने अफगाणिस्तानमध्ये कट्टर इस्लामी सत्ता येण्यासाठी प्रोत्साहन दिले, त्याचबरोबर वेगवेगळ्या प्रकारे मदतीची रसद पुरवली त्याच अफगाणिस्तानकडून आता पाकिस्तानवर हिंसक हल्ले वाढवले जात आहेत. अलिकडेच झालेल्या लष्करी संघर्षात तालिबानने पाकिस्तानच्या ५५ सैनिकांना ठार केले आहे. मागील काही दिवसांच्या सुरुवातीपासून दोन्ही देशांच्या सीमावर्ती भागात अंदाधुंद गोळीबार झाला होता. अफगाणी सैन्याने पाकिस्तानच्या पंधरा लष्करी चौक्या ताब्यात घेतल्याचा दावा केला गेला. दोन्ही देश स्वतःला मुस्लिम राष्ट्र म्हणवत असतानाही हा संघर्ष अनाकलनीय वाटतो. पाकिस्तानी लष्कराने सीमेवरील पंधरा निष्पाप अफगाणी नागरिकांना मारले होते. त्यावरून हा संघर्ष पेटला आहे.



रमजानच्या पवित्र महिन्यात देखील इस्लामी राज्यकर्त्यांना रक्तरंजित संघर्ष करावा लागला होता. यावरून धर्माच्या आधारावर एखाद्या राष्ट्राची निर्मिती झाली असेल तर समानधर्मीय राष्ट्रांमध्ये सौहार्दपूर्ण वातावरण राहीलच याची शाश्वती देता येत नाही.

आखाती देशातील शेजारी राष्ट्रेसुद्धा एकमेकांवर हल्ले करताना दिसून येतात. या पृष्ठभूमीवर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील वाढता संघर्ष भारतीय उपखंडासाठी चिंतेचा विषय झाला आहे. अफगाणिस्तानसारखा देश मागील अनेक दशके रशिया आणि अमेरिका यासारख्या महाशक्ती मानल्या जाणाऱ्या देशांच्या ताब्यात होता. तिथे तालिबानींच्या माध्यमातून धार्मिक इस्लामिक क्रांती झाल्याचे सांगितले जाते. ज्या अवस्थेत स्त्रियांना अतिशय अन्यायकारक वागणूक मिळत आहे. अफगाणिस्तान आणि पाकिस्तान या दोन शेजाऱ्यांमध्ये युद्ध पेटलेले असताना भारताचे मात्र अफगाण राज्यकर्त्यांशी मैत्रीचे संबंध आहेत. इतकेच नव्हे तर अफगाणी क्रिकेटपटूंना आपल्या देशातील जनता डोक्यावर घेत असते. त्याचबरोबर भारत आणि अफगाणिस्तान यांच्यामधील व्यापारी संबंधदेखील वाढत चालले आहेत. या पृष्ठभूमीवर तालिबान विरुद्ध पाकिस्तान हा संघर्ष मिटण्याची आवश्यकता आहे. युद्धग्रस्त वातावरणाची झळ सामान्यांनाच बसत असते. ▌

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास
**९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत भाजपच्या दोन दिवशीय निवासी कार्यशाळेचे उद्घाटन

## समर्थ कार्यकर्ता, सशक्त संघटना या संकल्पनेतून शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे नेत्यांकडून आवाहन





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मे**

भारतीय जनता पक्षाच्या 'पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान-२०२६' अंतर्गत हिंगोली जिल्हास्तरीय दोन दिवसीय निवासी कार्यशाळेचे उद्घाटन शनिवारी शहरातील हॉटेल शांती येथे मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

'समर्थ कार्यकर्ता, सशक्त संघटना' ही संकल्पना घेऊन आयोजित या कार्यशाळेचा मुख्य उद्देश पक्षाची विचारधारा, संघटनात्मक बांधणी आणि केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचा तळागाळातील लोकांपर्यंत प्रभावी प्रसार करणे या दोन दिवसांत विविध सत्रांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना वैचारिक आणि संघटनात्मक प्रशिक्षण दिले जात आहे.

या कार्यशाळेत प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, विधान परिषद सदस्य प्रा.संजय भेंडे आणि प्रदेश प्रवक्ता लक्ष्मणराव सावजी,भाजपा नेते रेणुकादास देशमुख, प्रदेश सचिव प्रविण घुगे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.



यावेळी आमदार तान्हाजीराव मुटकुळे, आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव, माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, जिल्हा संयोजक फुलाजीराव शिंदे, माजी जिल्हाध्यक्ष बाबाराव बांगर, अतिश दांडेगावकर माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, सुरजितसिंह ठाकूर, सुभाष लदनिया, दिलीप देसाई, जिल्हा प्रवक्ते विलास गोरे, युवाजिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, महिला जिल्हाध्यक्षा उज्ज्वला तांभाळे, सुनिता मुळे, क्रिष्णा रूहीटीया, अमित रूहीटीया, संजय ढोके, बाबा घुगे, माजी नगराध्यक्ष शिवदास बोड्डेवार, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, कार्याध्यक्ष पवन उपाध्याय, श्रीरंग राठोड, माजी सभापती उत्तमराव जगताप, भाजप पदाधिकारी मिलींद यंबल, यांच्यासह जिल्हाभरातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

कार्यशाळेच्या ठिकाणी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच जीवनप्रवास, 'एकात्म मानववाद' आणि 'अंत्योदय' विचार मांडणारे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. तसेच भारतीय जनसंघापासून ते आजच्या भाजपपर्यंतच ऐतिहासिक प्रवास आणि केंद्र व राज्य सरकारच्य योजनांसह हिंगोली जिल्ह्यात झालेल्या विकासकामांच्य माहिती फलकांचेही उद्घाटन जिल्हा प्रभारी संजय कौडगे यांच्या हस्ते करण्यात आले.

दोन दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेत जिल्हाभरातील भाजपचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार असून यावेळी विविध मान्यवरांची भाषणे होणार आहेत.

# उष्मालाटीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या संरक्षणासाठी सव यंत्रणांनी सज्ज रहावे- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मे**

राज्यात वाढत्या तापमानामुळे निर्माण होत असलेल्या उष्मालाट परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

वातावरणीय बदलामुळे उन्हाळी हंगामात तापमानात मोठ्या प्रमाणावर वाढ होत असून राज्यातील काही भागांमध्ये उष्मालाट सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीचा मानव, पशुपक्षी तसेच इतर घटकांवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून दक्षता घेणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, महसूल, कृषी, पशुसंवर्धन तसेच इतर संबंधित विभागांना उष्मालाट प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. विशेषतः शासकीय कार्यालये व कामाच्या ठिकाणी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सावलीची सुविधा, विश्रांतीसाठी जागा तसेच मजुरांसाठी आवश्यक त्या मूलभूत सोईसुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे.

तसेच बांधकाम कामगार, शेतमजूर, रस्त्यावर काम करणारे कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले व आजारी व्यक्ती यांनी दुपारच्या वेळेत अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडणे टाळावे, पुरेशा प्रमाणात पाणी प्यावे व हलक्या रंगाचे सूती कपडे वापरावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे. आरोग्य विभागाने उष्माघाताच्या लक्षणांबाबत जनजागृती करण्यासह प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालयांमध्ये आवश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पशुपालकांनीही जनावरांना सावली, स्वच्छ पाणी व योग्य काळजी उपलब्ध करून द्यावी, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. जिल्ह्यातील सर्व विभागांनी उष्मालाटीच्या पार्श्वभूमीवर सतर्क राहून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.



**हिंगोली- छावाच्यावतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. छाया- सुनील पाठक**

# सिरेहक शाह तलावामुळे हिंगोलीचा पाणी प्रश्न सुटणार- शिवाजी मुटकुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मे**

हिंगोली शहरातील महत्त्वपूर्ण ठरत असलेल्या सिरेहक शाह बाबा तलावाच्या सुशोभीकरण व विकासकामांची युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. हिंगोली जिल्हा वार्षिक निधीतून सुमारे १४ कोटी रुपयांच्या खर्चातून सुरू असलेल्या या कामांचा आढावा घेत त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी बोलताना शिवाजीराव मुटकुळे म्हणाले की, चिराग शहा तलाव हा हिंगोली शहराचा आत्मा आहे. आमच्या पिढीने दुष्काळ पाहिला, मात्र पुढील पिढीला दुष्काळ पाहावा लागणार नाही. या तलावामुळे शहरातील पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटणार असून शहरातील बोअरवेलनाही पाणी टिकून राहण्यास मदत होणार आहे.

तलावाचे काम अंतिम टप्प्यात आले असून पुढील एका महिन्यात काम पूर्णत्वाकडे जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. सुमारे ९८ एकर परिसर असलेल्या या तलावात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होणार असून परिसरातील शेतकरी व नागरिकांनाही त्याचा थेट फायद मिळणार आहे.

तसेच या विकासकामाचे ठेकेदार आसाराम घुगे हे अतिशय दर्जेदार पद्धतीने काम करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर हिंगोली शहरासाठी हा प्रकल्प जीवनदायी ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या पाहणीदरम्यान विलास गोरे, धायतडक, स्थानिक नागरिक, कार्यकर्ते तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### १७६६ क्विंटल साखरेचे नियतन मंजूर

हिंगोली- सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत जिल्ह्यातील अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना प्रतिमाह प्रति कुटुंब १ किलोच्या सुलभ पॅकींगमध्ये साखर वितरणासाठी शासनामार्फत माहे जून ते नोव्हेंबर २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी नियमित साखर नियतन मंजूर करण्यात आले आहे. या कालावधीसाठी हिंगोली जिल्ह्यास एकूण १७६५.९८ क्विंटल साखरेचे नियतन प्राप्त झाले असून संबंधित स्वस्त धान्य दुकानांमार्फत पात्र शिधापत्रिकाधारकांना साखरेचे वितरण करण्यात येणार आहे. नियतनाची उचल करून लाभार्थ्यांपर्यंत वेळेत साखर पोहोचविण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. जिल्ह्यातील तालुकानिहाय साखर नियतन पुढीलप्रमाणे आहे. हिंगोली तालुका- ४६०.२२ क्विंटल, कळमनुरी- ३६५.२८ क्विंटल, वसमत- ३४७.३४ क्विंटल, सेनगाव- ३७४.२८ क्विंटल आणि औंढा नागनाथ- २१८.४६ क्विंटल अशा प्रकारे जिल्ह्यासाठी एकूण १७६५.९८ क्विंटल साखरेचे नियतन मंजूर करण्यात आले आहे. सर्व अंत्योदय शिधापत्रिकाधारकांनी आपल्या संबंधित स्वस्त धान्य दुकानातून नियमानुसार साखरेची उचल करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

### शिक्षक पात्रता परीक्षा प्रमाणपत्र वाटपास प्रारंभ

हिंगोली- महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २०२५ चे आयोजन दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले होते. या परीक्षेतील पेपर क्र. १ (इयत्ता १ ली ते ५ वी स्तर) व पेपर क्र. २ (इयत्ता ६ वी ते ८ वी स्तर) यांचा अंतिम निकाल दिनांक ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने प्रसिद्ध करण्यात आला होता. या परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता प्रमाणपत्रे संबंधित जिल्ह्यांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद तसेच शिक्षण निरीक्षक, मुंबई (पश्चिम/दक्षिण/उत्तर) यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २०२५ मधील पात्र उमेदवारांच्या प्रमाणपत्रांचे वाटप दिनांक १८ मे २०२६ ते ०८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या ु.ीलर्शीपिश.ळपत्र्‍ या संकेतस्थळावरील सूचना काळजीपूर्वक वाचून आवश्यक मूळ कागदपत्रांसह ज्या जिल्ह्यात परीक्षा दिली त्या जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद अथवा शिक्षण निरीक्षक, मुंबई (प/द/उ) यांच्या कार्यालयाशी स्वतः संपर्क साधून आपले पात्रता प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्तांनी केले आहे.

### १६२ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १६२ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कारवाई केली असून त्यांच्याकडून १ लाख ७४ हजार ७०० रूपयांचा दंड वसूल केला आहे. अवैध दारू विक्री करणाऱ्या ९ ठिकाणी छापे मारून आरोपींतावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# औंढ्यात जनगणना २०२७ कार्यक्रमास सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मे**

औंढा नागनाथ जनगणनेच्या पहिल्या टप्प्याला १ मे २०२६ पासून सुरुवात झाली आहे. या जनगणनेत नागरिकांच्या घरातील विविध सुविधांची आणि कुटुंबाची माहिती संकलित केली जाणार आहे.

जनगणनेचा पहिला टप्पा १ मे पासून सुरू झाला असून, नागरिकांना ऑनलाइन स्व-गणना करण्यासाठी १५ मे २०२६ पर्यंत दिवसांचा अवधी देण्यात आला होता. प्रगणक जेव्हा घरभेटीसाठी येतील. तेव्हा हा युनिक आयडी क्रमांक त्यांना देणे आवश्यक आहे. जनगणनेसाठी प्रशासनाने २७५ प्रगणक, ४४ पर्यवेक्षक नियुक्ती केली आहे.संपूर्ण प्रक्रियेसाठी २८८ गट करण्यात आले आहेत. जनगणनेमध्ये प्रामुख्याने ३४ प्रश्न विचारले जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने घरातील टीव्ही, मोबाइल, संगणक, वाहन, शौचालय, प्रकाश आणि पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत, सांडपाणी व्यवस्था, स्वयंपाकाचे इंधन तसेच कुटुंबातील सदस्यांची माहिती, जातीचा प्रवर्ग, विवाहित जोडपी, घराची मालकी इत्यादी विषयांचा समावेश आहे.

जनगणनेचा दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ पासून सुरू होणार असून, त्यात लोकसंख्येची माहिती गोळा केली जाईल. प्रशासनाने सर्व नागरिकांना या राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले आहे.

औंढा नागनाथ तालुक्यातील प्रगणक यांच्या मार्फत १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत जनगणना साठी कामकाजाला सुरवात झाली आहे. त्या अनुषंगाने पर्यवेक्षक व प्रगणक यांना साहित्य वाटप करण्यात आले आहे. अशी माहिती चार्ज अधिकारी तथा तहसीलदार हरीश गाडे यांनी दिली आहे. जिल्ह्यात उन्हाचा पारा ४२ अंशावर असतांना जनगणनेची कामे करतांना शिक्षकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असतांना दिसत आहे.

# रस्त्यात अडवून जबरी चोरी करणारे आरोपी स्थागुशाकडून जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मे**

औंढा नागनाथ, हट्टा तसेच नांदेड येथे रस्त्यात अडवून हत्याराचा धाक दाखवून इसमांकडून मोबाईल व रोख रक्कम लुटणारे आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले असून त्यांच्याकडून २ लाख ४३ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार दि १०, ११ आणि १२ मे रोजी मोटारसायकलवर येऊन कुरूंदा पोलिस ठाण्याअंतर्गत भेंडेगाव रेल्वे गेटजवळ, औंढा नागनाथ येथील विक्रम हॉटेल, हट्टा हद्दीत एरंडेश्वर ते दारेफळ रोडवर, नांदेड जिल्ह्यातील उस्माननगर येथे हत्याराचा धाक दाखवून इसमांकडून मोबाईल व रोख रक्कम जबरीने चोरी करण्याच्या घटना घडल्या. याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले होते. या गुन्ह्यांचा तपास लावण्यासाठी पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांना आदेश दिले. त्याअनुषंगाने उपनि माधव जिव्हारे व त्यांच्या पथकाने तपास सुरू केला. सखोल तपास करून गोपनीय माहीती, तांत्रिक बाबींचा अभ्यास केल्यानंतर सदरचा गुन्हा नांदेड येथील किसन रमेश सुर्यवंशी वय २४ रा शिवनगर, आदीत्य शिवाजी जाधव वय २० रा खोब्रागडे व त्यांच्या चार साथीदारांनी मिळून केल्याचे समजले. या सर्वांनी हिंगोली व नांदेड जिल्ह्यात जबरी चोरीचे गुन्हे केल्याची माहीती मिळाली. किसन व आदीत्य यांना चोंडी येथून पथकाने ताब्यात घेतले. त्यांची विचारपूस केली असता त्यांनी गुन्ह्यांची कबुली दिली असून या आरोपींकडून ७ मोबाईल, एक पल्सर मोटार सायकल, व खंजीर असे एकूण २ लाख ४३ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यांच्याकडून हिंगोली व नांदेड जिल्ह्यातील चार जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, पोनि मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली उपनि माधव जिव्हारे, अंमलदार सुभाष घुगे, कोंडीबा मगरे, सतीश जाधव, विक्रम कुंदनानी, आजम प्यारेवाले, विशाल खंडागळे, किशोर सावंत, दत्ता नागरे, मारोती काकडे यांनी केली.

# औंढ्यात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मे**



तहसील कार्यालय औंढा नागनाथ येथे महसूल विभागांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर टप्पा-१ अंतर्गत आज शुक्रवारी समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरास नगराध्यक्ष कपील खंदारे, विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त रमेश काटकर उपस्थित होते.

उपविभागीय अधिकारी विकास माने यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित शिबिरात तहसीलदार हरीश गाडे व नायब तहसीलदार अनिता कोलगणे उपस्थित होते. या समाधान शिबिरामध्ये औंढा नागनाथ मंडळातील नागरिकांना मंडळ व तहसील स्तरावर विविध शासकीय सेवा प्रत्यक्ष उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये शिधापत्रिका वाटप, उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र वितरण, सातबारा नोंदी, सातबारा वरील शिवरस्ते नोंदी आदी महसुली कामांचा समावेश होता. तसेच संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, आरोग्य विभाग, कृषी विभाग, पंचायत समिती विभाग आणि इतर विविध शासकीय योजनांची माहिती व लाभ नागरिकांना देण्यात आले. यावेळी उपायुक्त रमेश काटकर, उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार हरीश गाडे आणि नायब तहसीलदार अनिता कोलगणे यांनी उपस्थित नागरिकांना विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास पुरवठा निरीक्षक कल्याणी हटवार, कृषी अधिकारी शिवप्रसाद संगेकर, मंडळ अधिकारी आशा गिते, तलाठी गजानन गुंजकर, विशाखा डोंगरे, जी. एस. मुकीर, भुसावळे, गजानन हजारे, रुप कळसकर, केशव जगताप, इमरान पठाण, अक्षय कांबळे, वहीद पठाण, नितेश कुलकर्णी यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अंध महिलेचे चोरीला गेलेले मंगळसुत्र दोन तासात परत

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १६ मे -**

सिडको परिसरातील अंध दाम्पत्याचा गैरफायदा घेत मंगळसूत्र चोरी करणाऱ्या महिला आरोपीस नांदेड ग्रामीण पोलिसांनी अवघ्या दोन तासांत अटक केली. गुन्हा दाखल झाल्यानंतर केवळ १२ तासांच्या आत आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून चोरी गेलेला मुद्देमाल जप्त करून पीडित महिलेला परत करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १३ मे रोजी दुपारी १ ते २ वाजण्याच्या सुमारास सिडको परिसरात अंध फिर्यादी महिला घरासमोर बसून केस विंचरत होत्या. त्यावेळी त्यांनी गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र काढून बाजूला ठेवले होते. या परिस्थितीचा फायदा घेत अज्ञात महिलेने सुमारे २ ग्रॅम वजनाचे व अंदाजे २० हजार रुपये किंमतीचे मंगळसूत्र चोरून नेले. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला.

उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर आणि पथकातील उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, सपोउपनि रामकिशन मोरे तसेच अंमलदार अनुराग मुळे, संतोष पवार, असीफ अली, गवेंद्र सिरमलवार व विष्णू कल्याणकर यांनी तातडीने तपास सुरू केला. गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून पोलिसांनी अवघ्या दोन तासांत आरोपी महिलेला ताब्यात घेतले.




कावेरी विकास मोरे (वय २५, व्यवसाय घरकाम, मूळ रा. अंबोली ता. नायगाव जि. नांदेड, सध्या रा. सिडको, नांदेड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. चौकशीत तिने चोरीची कबुली दिली असून इतर तीन गुन्ह्यांतील सहभागही उघड झाला आहे. पोलिसांनी तिच्याकडून चोरीचे मंगळसूत्र जप्त केले. अंध महिलेचे चोरी केलेले मंगळसूत्र नांदेड ग्रामीण पोलिसांनी त्या अंध महिलेच्या अंध पतीच्या हाताने तिच्या गळ्यात परिधान करायला लावले.

# डेंग्यू ताप आजार टाळण्यासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी; जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अमृत चव्हाण यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १६ मे -**

डेंगी ताप विशिष्ट विषाणुमुळे होतो. डेंगीचा प्रसार हा एडिस इजिप्टाय नावाच्या डासाच्या मादीमार्फत होतो. या डासाची उत्पत्ती साठवलेल्या स्वच्छ साठवून राहिलेल्या पाण्यात होते. कोणतेही पाणी आठ दिवसापेक्षा जास्त साठवून ठेवल्यास त्यामध्ये डास अंडी घालतात. त्यानंतर अंड्याचे रूपांतर डासात होते. कोणतेही साठविलेले पाणी हे आठ दिवसांपेक्षा जास्त ठेवू नाही. याबाबत नागरिकांनी खबरदारी घेणे आवश्यक असून डासाची उत्पत्ती कमी करुन नियंत्रणात ठेवण्यासाठी नागरिकांनी आरोग्य यंत्रणेला सहकार्याची आवश्यकता आहे.

नांदेड जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थेत राष्ट्रीय डेंग्यु दिन गुरुवार १६ मे २०२६ रोजी साजरा होत आहे. २०२६ या वर्षीचे घोषवाक्य डेंग्यु नियंत्रणासाठी लोकसहभाग : साठलेल्या पाणीसाठ्यांची तपासणी करा, स्वच्छता राखा आणि ती भांडी झाकूण ठेवा असे आहे. नागरिकांमध्ये जागरुकता आणून डासांपासून होणाऱ्या डेंग्यू आजारास प्रतिबंध करण्यासाठी राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा करण्यात येतो. डेंगीचा प्रसार हा एडिस इजिप्टाय नावाच्या डासाच्या मादीमार्फत होतो. या डासाची उत्पत्ती स्वच्छ साठवून राहिलेल्या पाण्यात होते. उदा. सिंमेट टाक्या, रांजण, प्लास्टिक रिकाम्या बादल्या, नारळाच्या करवंटया, घरातील शोभेच्या कुंडया, निरउपयोगी वस्तू, टायर्स व कुलर ईत्यादी. जास्त दिवस साठलेल्या ठिकाणी एडिस इजिप्टाय डासाची मादी अंडी घालते. एक डास एकावेळी दिडशे ते दोनशे अंडी घालते व यातून या डासाचा मोठा फैलाव होतो.

डेंगी ताप आजारात रुग्णास दोन ते सात दिवस तीव्र स्वरुपाचा ताप येतो. डोके, सांधे, स्नायु दु:खीचा त्रास होतो. रुग्णास उलट्या होतात. डोळ्याच्या आतील बाजू दुखणे, अंगावर पुरळ येणे, नाक-तोंड यातून रक्त स्त्राव होतो. अशक्तपणा, भुक मंदावते, तोंडाला कोरड पडते ही लक्षणे दिसून आलेल्या रुग्णांनी वेळेत जवळच्या शासकीय रुग्णालयात जाऊन मोफत तपासणी व उपचार करुन घेणे आवश्यक आहे.

नांदेड जिल्ह्यात मागील तीन वर्षांची डेंग्युची परिस्थिती पुढीलप्रमाणे आढळते. ( घेतलेले तपासलेले रक्तजल नमुने) कंसाबाहेर डेंग्यु दुषित रुग्ण, नंतरच्या (कंसात मृत्यू रुग्ण). सन २०२३- (१४९०) २९२ (निरंक). सन २०२४ (१३०२) २९७ (निरंक). सन २०२५ -(१०३९) १६१ (निरंक) तर एप्रिल २०२६ अखेर- (२०८) ०९ (निरंक).

भविष्यात डेंगीताप या आजाराचा उद्रेक होवू नाही. यासाठी काय काळजी घ्यावी याबाबत पुढील साधे व सोपे प्रतिबंधात्मक उपायांची नागरिकांनी अंमलबजावणी करावी. आपल्या घराभोवताली पाणी साचू देवू नका. घरातील पाण्याचे सर्व साठे आठवडयातून एकदा रिकामे करावीत. या साठयातील आतील बाजू व तळ घासुन पुसुन कोरडा करुन पुन्हा वापराव्यात व पाण्याचे साठे घट्ट झाकणाने झाकून ठेवावेत. आंगण व परिसरातील खड्डे बुजवावेत, त्यात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. ग्रामीण भागात ज्यांच्या शेतामध्ये शेततळे आहेत त्यांनी नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क करुन गप्पी मासे सोडावीत. झोपताना पूर्ण अंगभर कपडे घालावीत. पांघरुन झोपावे. सायंकाळी ६ ते ८ यावेळेत दारे खिडक्या बंद कराव्यात. खिडक्यांना जाळया बसवाव्यात. असे आवाहन नांदेडचे जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अमृत चव्हाण यांनी केले आहे.

## उपशिक्षणाधिकारी शिवाजीराव नाईकवाडे यांचा सत्कार

**नांदेड** -नुकत्याच शिक्षण सेवा पदोन्नती क्षेत्रातून शिक्षणविस्तार अधिकारी संवर्गातून उपशिक्षणाधिकारीपदी बढती मिळालेले जिल्हा परिषद नांदेडचे शिवाजीराव नाईकवाडे यांचा सत्कार माधवराव रेडेवाड केंद्रीय मुख्याध्यापक बरबडा यांच्या हस्ते संपन्न झाला. शिवाजीराव नाईकवाड यांची पदोन्नती जिल्हा परिषद अकोला येथे उपशिक्षणाधिकारी या पदावर झाली आहे. या सत्कार समारंभास आरटीओ वसंतराव कळंबरकर, चंद्रकांत गुंगेवाड, वैद्यकीय अधीक्षक मुखेड डॉ. बालाजी आदमपूरकर, ज्ञानेश्वर मरकंटे आदींची उपस्थिती होती.

## मनपाच्या शिक्षणाधिकारी प्रविणा मांदळे यांचा सत्कार

**नांदेड** -नुकत्याच शिक्षण सेवा पदोन्नती क्षेत्रातून शिक्षणविस्तार अधिकारी संवर्गातून उपशिक्षणाधिकारीपदी बढती मिळालेल्या जिल्हा परिषद नांदेडच्या आणि सध्या नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका येथे शिक्षणाधिकारी या पदावर पदोन्नती झालेल्या प्रविणा मांदळे यांचा सन्मान माधवराव रेडेवाड (केंद्रीय मुख्याध्यापक बरबडा) यांच्या हस्ते संपन्न झाला. प्रविणा मांदळे यांची पदोन्नती नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका येथे शिक्षणाधिकारी या पदावर झाली आहे. या सत्कार समारंभास माधवराव रेडेवाड यांच्यासह शंकर गालेवार, मारुती सांगवीकर, नामदेव चव्हाण, श्रीकृष्ण खानापूरकर, ज्ञानेश्वर मरकंटे, विजय मामीलवाड, अनिल कोंकेवार आदींची उपस्थिती होती. सातारा येथे आयोजित महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभात नांदेड जिल्ह्यास राज्यातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ग्रामविकास, कृषी व शेतकरी कल्याण केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज हा पुरस्कार देण्यात आला. जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले व माहूरचे गट विकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्राम विकास व पंचायत राजमंत्री जयकुमार गोरे, मंत्री शंभूराज देसाई, खा. श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले व अन्य मान्यवर उपस्थित होते.

## बायोमेट्रिक हजेरी प्रणालीला पशुचिकित्सा व्यवसायी संघटनेचा विरोध

**नांदेड** -शासनाकडून पशुसंवर्धन विभागात लागू करण्यात येत असलेल्या आधार-आधारित बायोमेट्रिक हजेरी प्रणाली (एडबीएस) विरोधात राज्यातील पशुवैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. महाराष्ट्र राज्य राजपत्रित पशुवैद्यकीय संघटना आणि पशुचिकित्सा व्यवसायी संघटना यांनी या प्रणालीला तीव्र विरोध दर्शवून संयुक्तपणे लढा पुकारला आहे.




नांदेड जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी पशु चिकित्सा व्यावसायी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. राहुल चव्हाण, कोषाध्यक्ष डॉ. लक्ष्मण सनकाडे, सचिव डॉ. शिवप्रसाद तेनलवार, , डॉ. वंदना बुद्धेवार, डॉ. बालाजी मेंढेवार, डॉ.रामराव डाकोरे आदी उपस्थित होते. पशुसंवर्धन विभागाचे कामकाज हे प्रामुख्याने क्षेत्रीय (फील्ड वर्क) स्वरूपाचे असते. अधिकारी व कर्मचाऱ्यांना दुर्गम भाग, वाड्या-वस्त्या आणि ग्रामीण भागात जाऊन पशुचिकित्सा सेवा द्याव्या लागतात. अशा परिस्थितीत मोबाईल-आधारित किंवा बायोमेट्रिक हजेरी सक्तीची करणे अव्यवहार्य नाही, असा दावा संघटनांनी केला आहे. ग्रामीण व डोंगराळ भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटी नसल्यामुळे हजेरी नोंदविण्यात तांत्रिक अडथळे येतात. पशुवैद्यकीय सेवा या अनेकदा आपत्कालीन स्वरूपाच्या असतात. हजेरीच्या तांत्रिक नियमांमुळे या सेवा देण्यास उशीर होऊ शकतो. कर्मचाऱ्यांवर वैयक्तिक मोबाईलद्वारे हजेरीची सक्ती करणे अन्यायकारक असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

## सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**नांदेड** -समस्याग्रस्त व पिडीत महिलांसाठी सोमवार दिनांक १८ मे २०२६ रोजी महिला लोकशाही दिन आयोजित केला आहे. समस्याग्रस्त व पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनाच्या दिवशी आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावे, असे आवाहन जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी नांदेड व सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन घेण्यात येतो. सोमवार १८ मे २०२६ रोजी सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली महसूल प्रबोधिनी (प्रशिक्षण केंद्र), एसबीआय एटीएमच्या मागे, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे महिला लोकशाही दिन होणार आहे. संबंधीत समितीचे सदस्य व शासन निर्णयात नमूद संबंधित विभागाचे अधिकारी यांनी उपस्थित रहावे, असेही आवाहन सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# भोकर येथे उद्या वंचित बहुजन आघाडीचा जनसंवाद मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. १६ मे -**

वंचित बहुजन आघाडी भोकर तालुक्याच्या वतीने सोमवार दि.१८ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता संगम फंक्शन हॉल, रेल्वे स्टेशन रोड,भोकर येथे सत्कार सोहळा व कार्यकर्त्यांचा भव्य जनसंवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास पक्षाचे राज्य व जिल्हास्तरीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

मेळाव्याचे अध्यक्षस्थान वंचित बहुजन आघाडीचे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष प्रा.राज अटकोरे भूषविणार असून,प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य वंचित बहुजन आघाडी चे गोविंद दळवी हे उपस्थीत राहाणार आहेत तर कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून वंचित बहुजन आघाडीचे समन्वयक म्हणून ड.सिद्धार्थ कदम हे राहाणार आहेत तर या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष फारूख अहमद,राज्य सदस्य ड.अविनाश भोसीकर,पक्ष नेते शिवा नरंगले,मराठवाडा सदस्य डॉ.संघरत्न कुऱ्हे, नांदेड जिल्हा अध्यक्ष (दक्षिण) शंकर ग महाजन वंचित बहुजन आघाडी नांदेड,माजी जिल्हाध्यक्ष निरंजनाताई औटे (लव्हाळे),के. एच.वन्ने, दिपक रुद्राजी मगर,नगरसेवक ड.शेख बिलाल अहमद,आकाश रुपकराव जोधळे,कुलदीप राक्षसमारे,प्रकाश कोल्हे ,आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.बहुजनहृदयसम्राटश्रद्धेयड.बाळासाहेब आंबेडकर यांचे हात बळकट करण्यासाठी तसेच बहुजन समाजाच्या न्याय,हक्क व स्वाभिमानाच्या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन या मेळाव्याच्या माध्यमातून करण्यात आले आहे.तालुक्यातील व परिसरातील सर्व पदाधिकारी,बूथ कमिटी सदस्य,ग्राम शाखा पदाधिकारी,निष्ठावान कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा,असे आवाहन आयोजक ड. सिद्धार्थ कदम,आनंदराव एडके,सुभाष तेले, राजू गजभारे,शबीर मोहीद्दीन शेख,राजू दांडगे,प्रमोद गौवंदे,सुमेश फुगले,प्रसाद शहाणे, माणिक जाधव,सत्यपाल कदम,चंद्रकांत चव्हाण,ड.राहुल कदम,चंद्रकांत कांबळे, दिलीप राव,सुमेध जाधव,मुकुंद धोतरे,ग्यानु चव्हाण,दत्तात्रय भडंगे,दिलीप चव्हाण तसेच वंचित बहुजन आघाडी भोकरच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी आवाहन केले आहे.



# जेईई परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १६ मे -**

जेईई JEE-dvanced २०२६ परीक्षा रविवार १७ मे २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५.३० या कालावधीत नांदेड जिल्ह्यात ४ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी प्रतिबंधात्मक आदेश निर्गमीत केले आहेत.

या आदेशात नमूद केलेल्या आर.जी.जी. हायटेक डिजीटल झोन / राजीव गांधी कॉलेज कॅम्पस विद्युत नगर नांदेड, आय ऑन डिजीटल झोन विष्णुपुरी नांदेड, एसएसएस इंदिरा इन्स्टीटूट ऑफ टेक्नॉलॉजी विष्णुपुरी संयोग कॅम्पस नांदेड. श्री संभाजी कॉलेज ऑफ प्रायमरी शामल एज्युकेशन कॅम्पस देगावरोड समोर नांदला दिग्रस खडकूत या ४ परीक्षा केंद्रापासून १०० मीटरच्या परिसरात रविवार १७ मे २०२६ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंतच्या वेळेत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेच परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कार्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅल्क्युलेटर, ट्रॅन्टीस्टर, रेडिओ, लॅपटॉप, इत्यादी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या ५०० मीटर पर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास तसेच परीक्षा केंद्रात नेण्यास त्याचप्रमाणे सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एस.टी.डी., आय.एस.डी, भ्रमणध्वनी, पेजर, फॅक्स, झेरॉक्स आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास या आदेशाद्वारे प्रतिबंध करण्यात आले आहे.

# शनी अमावस्या निमित्त अभिषेक व महाप्रसाद कार्यक्रमाला हजारो भाविकांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर, दि. १६ मे -**

येथील शनी मंदिरात शनी जयंती व शनि अमावस्या निमित्त आयोजित करण्यात आलेला भव्य धार्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविक भक्तांची मोठी गर्दी उसळली होती. जय शनीदेवच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

शनीदेवांचा विधिवत अभिषेक मंत्रोच्चार व पारंपरिक धार्मिक विधींनी करण्यात आला. अभिषेक सोहळ्यासाठी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने उपस्थिती लावत दर्शनाचा लाभ घेतला. शनीदेवांच्या दर्शनासाठी मंदिरात दिवसभर रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

यानंतर आयोजित करण्यात आलेल्या भव्य महाप्रसादाचा हजारो भाविक भक्तांनी लाभ घेतला. परिसरातीलच नव्हे तर दूरवरून आलेल्या भाविकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन शनी मंदिर समितीच्या वतीने अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी समिती सदस्य व स्वयंसेवक दिवसभर सेवेत कार्यरत होते. दर्शन व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा, वाहन पार्किंग तसेच महाप्रसाद वितरणाची व्यवस्था उत्तम प्रकारे सांभाळण्यात आली.

धार्मिक उत्साह, भक्तीभाव आणि शिस्तबद्ध नियोजनामुळे इस्लापूर येथील शनी जयंती उत्सवाने भाविकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल भाविकांनी शनी मंदिर समितीवर कौतुकाचा वर्षाव केला.

# श्री. सुभाष शुगरमध्ये मिल रोलर पूजा समारंभ उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. १६ मे -**

श्री सुभाष शुगर प्रा. लि. हडसनी ता. हदगाव जि. नांदेड येथील कारखान्याचा गळीत हंगाम २०२६- २७ चा सातवा मिल रोलर पूजा समारंभ चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व कार्यकारी संचालक सुशीलकुमार सुभाषराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सातवा मिल रोलर पूजन कार्यक्रमाचे आयोजन दि.१४ मे २०२६ रोजी सकाळी ९.३० मिनिटांनी कारखान्याचे मुख्य लेखापाल भास्कर बळवंतराव गावंडे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. शितल गावंडे यांच्या शुभहस्ते उत्साहाच्या वातावरणात पार पडला. यावेळी कारखान्यातील सर्व खाते प्रमुख, उप खातेप्रमुख, अधिकारी, कर्मचारी व कामगार बांधव उपस्थित होते तर कारखान्याने गळीत हंगाम २०२६-२७ करिता सात लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले आहे असे कारखान्याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख यांनी सांगितले आहे.




श्री सुभाष शुगर या हदगाव तालुक्यासह उमरखेड व हिमायतनगर परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी बांधवांची कामधेनू ठरलेल्या व आर्थिक बाजू मजबूत करण्याच्या दृष्टीने कारखान्याची यशस्वीपणे वाटचाल चालू असून गाळप क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केले जात आहेत. येणाऱ्या गाळप हंगामासाठी अंतर्गत कामे जसे की, क्लीनिंग, पॅन व आवश्यक ती यंत्रणे बदलण्याची जेणेकरून गाळपामध्ये कोणतीही व्यतय येऊ नये यासाठी पूर्वतयारी म्हणून सर्व दुरुस्ती करण्याच्या अगोदर मिल रोलरचे पूजन करण्याची प्रथा आहे. त्याच अनुषंगाने दि.१४ मे रोजी गळीत हंगाम २०२६-२७ चा सातवा मिल रोलर पूजा समारंभ मोठ्या उत्साहाच्या वातावरणात पार पडला.

**ऊस उत्पादक शेतकरी बांधवांच्या प्रगतीसाठी सदैव कटिबद्ध : कार्यकारी संचालक सुशीलकुमार देशमुख**

श्री सुभाष शुगर कारखान्याने अविरतपणे व पूर्वीपेक्षा जास्त गाळप करण्याची क्षमता अद्यावत यंत्र द्वारे स्वीकारलेली असून या परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उसाची लागवड करावी त्यासोबतच हदगाव - हिमायतनगर तालुका, कळमनुरी तालुका व उमरखेड तालुक्यातील देवसरी, चालगणी, लोहरा, खरूज, चातारी, ब्राह्मणगाव, कोपरा, मानकेश्वर, बोरी, उंचवडद, दिघडी या परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी उसाची मोठ्या प्रमाणात लागवड करून आपल्या हक्काचा श्री सुभाष शुगर या कारखान्यास गाळपास ऊस देऊन सहकार्य करावे असे नम्र आवाहन कार्यकारी संचालक सुशील कुमार देशमुख यांनी केले आहे.



# नांदेड तालुक्यात जनगणना २०२७ च्या प्रत्यक्ष कामास आजपासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १६ मे -**

भारतीय जनगणना २०२७ अंतर्गत घर यादी व घर गणना अभियानाच्या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालय, नांदेड अंतर्गत सर्व प्रगणक व पर्यवेक्षकांचे अंतिम प्रशिक्षण शंकराव चव्हाण सभागृह येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. ग्रामीण भागातील प्रत्यक्ष जनगणना कार्यास उद्यापासून सुरुवात होत असून प्रशासनाने त्यासाठी संपूर्ण तयारी पूर्ण केली आहे.

या प्रशिक्षणामध्ये जनगणनेदरम्यान आवश्यक असणाऱ्या विविध बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः मांडणी दर्शक नकाशा अचूक पद्धतीने कसा तयार करावा, गावातील प्रत्येक घराची नोंद कशी करावी, तसेच घरांची क्रमवारी व भौगोलिक मांडणी कशी ठेवावी याबाबत प्रत्यक्ष उदाहरणांसह माहिती देण्यात आली. याशिवाय केंद्र शासनाच्या क्ष्ल्ज ि चा वापर करून डिजिटल पद्धतीने माहिती नोंदविणे, माहिती अपलोड करणे, स्वगणना आयडी तपासणे आणि ऑनलाइन प्रक्रियेमधील अडचणी सोडविणे याबाबतही सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

सदर कार्यक्रमाला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी प्रमुख उपस्थिती लावून सर्व प्रगणक व पर्यवेक्षकांना मार्गदर्शन केले. त्यांनी जनगणना ही देशाच्या विकासाचा पाया असल्याचे सांगत प्रत्येक कर्मचाऱ्याने जबाबदारीने, अचूकता व पारदर्शकतेने काम करण्याचे आवाहन केले. शासनाच्या विविध योजना, विकास आराखडे आणि संसाधनांचे नियोजन हे जनगणनेतील माहितीवर आधारित असते, त्यामुळे प्रत्येक घरापर्यंत पोहोचून योग्य माहिती संकलित करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी स्वगणना प्रक्रियेत शंभर टक्के यश संपादन करणाऱ्या वाडी करडेल व गुंडेगाव येथील प्रगणक व पर्यवेक्षकांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. स्वगणना पूर्ण झाल्यामुळे प्रत्येक कुटुंबाला स्वतंत्र स्वगणना आयडी प्राप्त झाला असून त्यामुळे प्रत्यक्ष जनगणना प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक ७७०/२०२८ कलम १९
सार्वजनिक न्यासाचे नांव : गती फाउंडेशन कोपरा ता. किमवट जि.नांदेड
अर्जदार नांव : कोडवा मारोती वलकुलवाड.

सर्व संबधित लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड, विभाग नांदेड हे वर नमुद केलेल्या अहवालू अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१. वर नमुद केलेला सार्वजनिक न्यासा अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
२. खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीचा आहे काय?
अ) जंगम मिळकत (वर्णन) : अर्जदार यांच्या कडे सभासद फी रुपये ३५००/- जमा आहेत.
ब) सदर मिळकत (वर्णन) :

सदरच्या चौकशी प्रकरणामधे कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत हि नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखे पासून तीस दिवसाच्या आत या कार्यालयाच्या पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास कांही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाच्या निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जाईल.

ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड याचे शिक्यानिशी आज दिनांक १२/०५/२०२६ रोजी दिली.


**(श्रीरामे बि. एन)**
**वरिष्ठ लिपिक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**नांदेड विभाग नांदेड**

**(बि.जि. गंगावणे)**
**(आधिक्षक)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**नांदेड विभाग नांदेड**

## पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था
## रौप्य महोत्सव

# जलसंधारणाची यशस्वी 25 वर्षे

‘धावणाऱ्या पाण्याला चालायला लावा,
चालणाऱ्या पाण्याला थांबायला लावा,
थांबणाऱ्या पाण्याला जमिनीत जिरवा,
गावातील पाणी गावात, घरातील पाणी घरात,
शेतीतील पाणी शेतीत...’
ना. श्री. नितीन गडकरी



— मार्गदर्शक —
**मा. श्री. नितीनजी गडकरी**
मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग, भारत सरकार

रविवार 17 मे 2026

## नागपूर जलसंवाद 2026

वेळ : दुपारी 4:00 वाजता
स्थळ : स्व. वसंतराव देशपांडे सभागृह, सिव्हिल लाईन्स, नागपूर

**विषय : शेतकरी आत्महत्या-मुक्त विदर्भासाठी जलसंवर्धन एक प्रभावी उपाय**

**विशेष अतिथिः**

**मा. श्री. अनिल प्रकाश जोशी**
(पद्मभूषण व पद्मश्री प्राप्त)
डेहराडून, उत्तराखंड

**मा. श्री. उमाशंकरजी पांडे**
(पद्मश्री प्राप्त जलयोद्धा)
चित्रकूट, उत्तर प्रदेश

**मा. श्री. सेठपाल सिंग**
(पद्मश्री पुरस्कार प्राप्त)
सहारनपूर, उत्तर प्रदेश

**मा. श्री. संजय कश्यप**
मुख्य कार्यकारी संचालक,
सेंटर फॉर वॉटर पीस, नवी दिल्ली

**मा. श्रीमती स्वेडेविनो नात्सो**
जल आणि पर्यावरण तज्ज्ञ
कोहिमा, नागालँड

**विशेष उपस्थितिः**

**मा. ॲड. आशिष जयस्वाल**
राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन

**मा. डॉ. पंकज भोयर**
राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन

**विशेष आकर्षण**
‘जलपर्व’, ‘जलक्रांती’, ‘कृषी कल्याण’
आणि ‘कॉरिडॉर्स ऑफ वॉटर सिक्युरिटी’
पुस्तकांचा प्रकाशन सोहळा

सोमवार 18 मे 2026

## जलक्रांती परिषद

वेळ : सकाळी 10.00 वाजता
स्थळ : कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग, नागपूर

**विशेष आकर्षण**



**मा. श्री नाना पाटेकर**
सुप्रसिद्ध अभिनेते
अध्यक्ष, नाम फाउंडेशन



**मा. श्री आमिर खान**
सुप्रसिद्ध अभिनेते
संस्थापक, पाणी फाउंडेशन



**मा. श्री मकरंद अनासपुरे**
सुप्रसिद्ध अभिनेते
सचिव, नाम फाउंडेशन

**प्रमुख पाहुणे**

**मा. श्री संजय राठोड**
मंत्री, मृदा व जलसंधारण
महाराष्ट्र शासन

**मा. डॉ. शरद गडाख**
कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख
कृषी विद्यापीठ, अकोला

**मा. डॉ. प्रशांत बोकारे**
कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली

## पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थे अंतर्गत
# 60+ गावे,
## लाखो नागरिक, हजारो शेतकरी कुटुंबांना थेट लाभ

# ‘तामसवाडा पॅटर्न’

भूजल संरचना अभ्यासावर आधारित शास्त्रीय व लोकसहभागी
उपक्रमांमधून जलसंधारणाची प्रभावी चळवळ उभी करण्यात यश.











नाले पुनरुज्जीवन, भूजल पुनर्भरण आणि पाणलोट विकासाच्या माध्यमातून → हजारो हेक्टर शेती सिंचनाखाली | कोरडवाहू भागात जलसमृद्धी | शाश्वत शेतीला नवी दिशा | जलसंधारणातून ग्रामसमृद्धी

**शेती आणि शेतकऱ्यांच्या कल्याणाचा ध्यास, जलसंधारणातून ग्रामसमृद्धीचा प्रवास**

**विनीत :** श्री प्रफुल्लदत्त जामदार, अध्यक्ष । श्री माधव कोटस्थाने, सचिव । सर्व पदाधिकारी व सदस्य, पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था

शुभेच्छुक | ASHMI ROAD CARRIERS PVT. LTD. | vishvaraj Responsible Revolutions | SMS LTD | KCC KHALATKAR CONSTRUCTION INFRA PVT. LTD. | M/s. D. C. GURBAXANI ENGINEERS & CONTRACTORS